। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २८९ वा । सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### हप्ता मागून केली मारहाण:गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुजित राजेंद्र गुंडाळे, वय २८ वर्षे, रा. यशवंत नगर बार्शी नाका धाराशिव ता.जि. धाराशिव यांचे बोस्टन टी पार्टी अमृततल्य दुकानात राहुल उर्फ छोट्या रा. वडार गल्ली धाराशिव यांनी दि.३०.०१.२०२६ रोजी १४.१५ वा. सु. सुजित गुंडाळे यांनाराहुल उर्फ छोट्याने चहाचे दुकान चालवायचे असेल तर दर हपत्याला १२०० द्यावे लागतील असे म्हणून शिवीगाळ करुन फिर्यादीस व कामगार नरेश साळुंके यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. व गल्ल्यातील १,८३० जबरीने काढुन घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुजित गुंडाळे यांनी दि.३०.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### चार शेळ्या व पाच बोकडाची केली चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गोपाळ गणपती चव्हाण, वय ३८ वर्षे, रा. वाणेवाडी ता. जि. धाराशिव यांचे वाणेवाडी शिवारातील शेत गट नं २४९ मधील चार शेळ्या, पाच बोकडे असा एकुण ७८,००० किंमतीचा माल हा दि.२७.०१.२०२६ रोजी १९.०० ते दि.२८.०१.२०२६ रोजी ०५.३० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गोपाळ चव्हाण यांनी दि.३०.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे ये गुन्हा नोंदवला आहे.

### आडोतीस हजारच्या डीसी केबलची चोरी

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :दि.१८.०१.२०२६ रोजी अंतर्गत आरसोली शिवारातील गट नं ९३ सौर उर्जा प्रकल्पा मधील सौर प्रकल्पातील ११ ईर्न्वटरची एकुण १९०० मिटर डी.सी. केबल अंदाजे ३८,०००किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-कृष्णकुमार श्रीवास सारडा, वय २८ वर्षे, रा. तिरुपती विहार, बालाजी मंदीर जवळ लातुर ता. जि. लातुर यांनी दि.३०.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे ये गुन्हा नोंदवला आहे.

### घरी जावून केला लैंगिक अत्याचार

परंडा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील ३९ वर्षीय महिला दि.१२.१२.२०२२ ते दि.०८.११.२०२५ रोजी हिस एका गावातील एका तरुणाने तिचे घरी जावून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२९.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिवची लेक राज्याची पहिली महिला उपमुख्यमंत्री; सुनेत्राताईंच्या रुपाने संधी



धाराशिव : जिल्ह्याचे नाव डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या रूपाने मुख्यमंत्रीपदाच्या चर्चेत अनेकदा आले; पण नशिबाची साथ न मिळाल्याने ती संधी हुकली. आता मात्र उपमुख्यमंत्रीपदावर जिल्ह्याची लेक विराजमान झाल्याने मुख्यमंत्रीपद हुकल्याची हुरहुर काहीशी भरून निघाली आहे.

डॉ. पाटील यांच्या भगिनी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्या सुनेत्रा अजित पवार यांची या पदावर निवड झाल्याने, विकासकामांच्या बाबतीत 'माहेर'ला झुकते माप मिळेल, अशी आशा सामान्य जनतेतून व्यक्त होऊ लागली होती ती पूर्ण झाली. तेर हे सुनेत्राताईंचे माहेर असून डॉ. पद्मसिंह पाटील हे त्यांचे बंधू आहेत.

अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्यानंतर त्यांच्या जागेवर पत्नी सुनेत्रा यांची निवड राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार मुख्यमंत्री असताना डॉ. पाटील हेही सातत्याने मंत्रीमंडळात असायचे. या दोन्ही नेत्यांच्या घट्ट मैत्रीतूनच अजित पवार आणि सुनेत्राताईंचा संसार आकाराला आला. प्रत्येक महत्त्वाचा घरगुती कार्यक्रम असला, की सुनेत्राताईंची तेरला भेट ठरलेली असते. त्यामुळे माहेरची ओढ त्यांना असल्याचे यातून स्पष्ट होते. ज्येष्ठ बंधू डॉ. पाटील वयोमानामुळे सध्या राजकारणात सक्रिय नसले, तरी कुटुंबाची मोट बांधून ठेवणारा मुख्य धागा म्हणून ते आजही आपली जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांचे पुत्र, म्हणजेच सुनेत्राताईंचे भाचे राणाजगजितसिंह पाटील हे भाजपचे आमदार आहेत. सुनेत्राताईंना राजकीय वारसा माहेरकडून जसा लाभलेला आहे, तसाच तो सासरकडूनही वैभवशाली आहे. त्यामुळे राजकारण हा विषय त्यांच्यासाठी नवा नाही. दोन-अडीच वर्षांपूर्वी घडलेल्या राजकीय नाट्यानंतर अजितदादांनी वेगळी भूमिका घेतली. त्यानंतर बारामती लोकसभा मतदारसंघातून सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार यांनी निवडणूक लढवली; मात्र त्यात त्यांचा पराभव झाला.

त्यानंतर काही दिवसांतच अजित पवार यांनी सुनेत्रा पवार यांना राज्यसभेसाठी संधी देत विजयी केले. २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर, रक्षाविसर्जनाच्याच दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्या आणि उपमुख्यमंत्रीपदासाठी सुनेत्राताईंचे नाव चर्चेत आले. त्यानंतर शनिवारी त्यावर शिक्कामोर्तब झाले. आता जिल्ह्याचीच लेक 'नंबर दोन'च्या अतिशय महत्त्वाच्या पदावर विराजमान झाल्याने जिल्हावासीयांच्या विकासाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मागील कालखंडात अनेकदा मुख्यमंत्रीपदासाठी डॉ. पाटील यांचे नाव चर्चेत यायचे; मात्र या पदाने त्यांना नेहमीच हुलकावणी दिली. ती हुरहुर डॉ. पाटील घराण्याच्या हितचिंतकांच्या मनात होती. ती आज काही अंशी सुनेत्राताईंच्या निवडीने भरून निघाली आहे. हे नक्कीच!!!

### केंद्रीय भूजल विभागाची कार्यशाळा

## भूजल व्यवस्थापनासाठी माहितीचा प्रभावी वापर अत्यावश्यक- जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिव,दि.३० जानेवारी(जिमाका)भूजल व्यवस्थापन हे केवळ एका विभागापुरते मर्यादित न राहता सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून होणे आवश्यक आहे.केंद्रीय भूजल विभाग व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या (ऋडअ-) डेटाबेसचा समन्वित व व्यापक वापर करून जिल्हास्तरीय नियोजन अधिक परिणामकारक करता येईल. गावपातळीवरील जलसुरक्षा आराखडे, पाणी पुनर्भरण प्रकल्प आणि दीर्घकालीन जलधोरणांसाठी ही माहिती अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी केले.

शासकीय कार्यालयांमध्ये निर्माण होणाऱ्या मौल्यवान माहिती भांडाराचा स्थानिक भूजल व्यवस्थापन प्रकल्पांमध्ये अधिकाधिक प्रभावी वापर व्हावा,या उद्देशाने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय भूजल विभाग,पुणे यांच्या वतीने एक अभिनव व आश्वासक उपक्रम हाती घेण्यात आला आहे.या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी केंद्रीय भूजल विभागाच्या भूजल माहिती भंडार तसेच जलधर नकाशाकरण अभ्यास प्रकल्पांचे उपयोग या विषयावर जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय भूजल विभागाचा तळागाळापर्यंत सखोल परिचय व्हावा,विभागातील भूजल वैज्ञानिकांचे कार्य व त्याचे महत्त्व सर्व संबंधित विभागांना समजावे,या हेतूने आयोजित कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून श्री.पुजार बोलत होते.कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व अतिरिक्त पोलीस अधीक्षक शफकत आमना यांची उपस्थिती होती.

डॉ.मैनाक घोष यांनी भूजलविषयक अद्ययावत व विश्वासार्ह डेटा उपलब्धतेचे महत्त्व अधोरेखित करत,अंतिम वापरकर्ते व विविध अंमलबजावणी यंत्रणांनी या माहितीचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले.विशेषतः ग्रामस्तरीय जलसुरक्षा योजना तयार करताना या संसाधनांचा सक्रिय वापर करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

या कार्यशाळेत डॉ.उपेंद्र धोंडे,वरिष्ठ भूजल वैज्ञानिक,केंद्रीय भूजल विभाग,पुणे यांनी केंद्रीय भूजल विभागांतर्गत निर्माण माहिती - संसाधनांचा प्रसार आणि उपयोग या विषयावर सविस्तर तांत्रिक सादरीकरण केले.त्यांनी धाराशिव जिल्ह्यासाठी राष्ट्रीय एक्विफर मॅपिंग (छ-टणखच्) चे निष्कर्ष मांडून उत्रथ्इ डेटा पोर्टल,खछत्रठएड आणि थठखड या प्रणालींचा वापर करून क्षेत्रीय पातळीवर नियोजन वध निर्णय प्रक्रिया अधिक शास्त्रीय कशी होऊ शकते,याचे प्रात्यक्षिक सादर केले.

या प्रसंगी कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथा या कॉफी टेबल पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व ते सहभागी अधिकारी व प्रतिनिधींना वितरित करण्यात आले. तसेच केंद्रीय भूजल विभागाच्या विविध उपक्रम आणि राष्ट्रीय जलधर नकाशाकरण कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती असलेली पुस्तिकाही वितरित करण्यात आली.

या कार्यशाळेला भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,जलसंपदा विभाग,मृदा व जलसंधारण,जलसंधारण विभाग (थउऊ),लघु सिंचन,वन,कृषी विभाग तसेच अन्य संबंधित शासकीय व निमशासकीय विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

ही कार्यशाळा सध्या काही निवडक जिल्ह्यांमध्ये घेण्यात येत असून, पुढील टप्प्यात ती राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्याचा मानस असल्याचे केंद्रीय भूजल विभागाच्या वतीने सांगण्यात आले.या उपक्रमामुळे केंद्रीय भूजल विभागाच्या कामाची व उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोहोचून जलसंवर्धन आणि शाश्वत जलव्यवस्थापनासाठी नवी दिशा मिळेल,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यशाळेचा समारोप संवादात्मक अभिप्राय सत्राने झाला.विविध विभागांतील एकूण ५५ अधिकारी - कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.आभार श्रीमती व्ही.हेमलता,भूजल वैज्ञानिक यांनी मानले.

## जळकोट जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा महाविकास आघाडीचा प्रचाराचा शुभारंभ



जळकोट (विजय पिसे)- जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा महाविकास आघाडीचा प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. प्रथमता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार घालून प्रचार सभेची सुरुवात करण्यात आली. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाविकास आघाडीच्या प्रचारार्थ जाहीर सभेत काँग्रेसची विचार धारा संपण्याचा डाव या लोकांनी रचलेला आहे असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे बोलत होते. जळकोट जिल्हा परिषद मतदार संघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ. प्रतीक्षा गोपाळ सुरवसे जळकोट पंचायत समिती गणातून महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन चव्हाण व होर्टी पंचायत समिती गणातून उभे असलेले महाविकास आघाडीच्या सौ. सुवर्णा संजय गुंजोटे यांच्या प्रचारार्थ जळकोट येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी हनुमंत सुरवसे हे होते. यावेळी बोलताना देशातील सर्वसामान्य गोरगरिबांसाठी असलेली काँग्रेसची विचारधारा संपण्याचा विरोधकांचा डाव आहे हा डाव हाणून पाडण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन हर्षवर्धन सपकाळ त्यांनी केले. या सभेत बोलताना ओमराजे निंबाळकर असे म्हणाले की धाराशिव जिल्ह्याच्या जनतेसाठी विरोधकाची भूमिका मी ठामपणे मांडत आहे. ज्यांच्या घरात चाळीस वर्षापासून सत्ता आहे तरी देखील जिल्ह्याचा विकास का झाला नाही.असा सवाल करून धाराशिवला मेडिकल कॉलेज सुरू केले, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून जळकोट वाडी, मानमोडी व चिचकोरी तांडा येथील रस्त्याचे डांबरीकरण केले. बोरगाव ते जळकोट लिंक लाईनचे काम केले. जळकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या सुशुभीकरण, सिमेंट रस्ते, व जलजीवन अंतर्गत विविध गावची कामे पूर्ण केली. ही विकास कामे आम्ही असे करतो नुसते बोलत नाही असे ओमराजे निंबाळकर म्हणाले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा असे ओमराजे निंबाळकर यांनी मतदारांना आवाहन केले.

या प्रचार सभेस काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, जळकोट गावचे सरपंच गजेंद्र कदम,सत्यवान भाऊ सुरवसे, शिवसेनेचे तालुका संघटक कृष्णात मोरे, अनिल छत्रे, ब्रह्मानंद कदम, गोपाळ सुरवसे, अतुल कलशेट्टी, रोहन पाटील, संजय वाघोले, सरपोदिन पटेल, संजय गुंजोटे, सुरज जाधव, मेहबूब बागवान महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व महिला मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा माहिती कार्यालयात हुतात्म्यांना आदरांजली



धाराशिव दि.३० जानेवारी (जिमाका) देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी आज हुतात्मा दिनी जिल्हा माहिती कार्यालय येथे ११ वाजता दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,वरिष्ठ लिपिक नंदू पवार,कनिष्ठ लिपिक दिलीप वाठोरे, चित्रा घोडके,मोहन कोळी, अनिल वाघमारे,माध्यम कक्षातील प्रा.बी. एस.उडचण,प्रा.संतोष भांडेकर, युसुफ मोमीन,अमोल कस्तुरे,अतुल पवार,शैलेश खारगे व विनोद जानराव यांची उपस्थिती होती.

## दरोड्याची तयारी करणाऱ्यांना परंडा पोलीसांनी केली अटक

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सुरज रा. इंदीरानगर वसृती भुम, आप्पा वय ६५ वर्षे,रा. साकत(खु), नवनाथ वय ७६ वर्षे,रा. त्रिंत्रज ता. भुम, अभिमान वय ५४ वर्षे, रा. इंदीरानगर भुम, नरहरी वय ३५ वर्षे, रा.त्रिंत्रज, गणेश , वय ३३ वर्षे, शोभा वय ३५ वर्षे, रा. इंदीरानगर वस्ती भुम, चिमु वय १९ वर्षे, रा. वालवड ता.भुम यांनी दि.२९.०१.२०२६ रोजी परंडा ते पांचपिपळा रोडवर उजवे बाजूस गायरान जमिनीमध्ये पाझर तलावाच्या खड्यात संगणमत करुन चार मोटरसायकल, एक काटवणी, कोयता, लोखंडी कटर, लाल टिकटची पुडी, सुतारी दोरी, मोबाईल फोन ५ असे एकुण २,१५,३०० किंमतीचे साहित्य घेवून दरोडा टाकण्याच्या उद्देशाने गट करुन, दबा धरुन बसलेले परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी नमुद साहित्य जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- ३१०(४), ३१०(५) अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेश

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राज्यात अचानक घडल्या घडामोडी...

राज्यात अचानक घडामोडी घडल्या गेल्या. त्यामागील कारण म्हणजे अजित पवार यांच्या आकस्मित निधन झाले, त्यामुळे राजकिय पेच निर्माण होणे स्वाभाविक होते. राज्यात भाजपाच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादीचे अजित पवार व एकनाथ शिंदे यांची शिवसेना सत्तेत सहभागी आहेत. दोन उपमुख्य असल्याने अजित पवार यांच्याजागी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार याना देण्यात आले आहे. या बाबत पवार कुटुंबियातील जेष्ठ नेते शरद पवार यांना ही बाब आवडली का नाही हे समजू शकले नाही. या राजकिय घडामोडी त्यांना माहिती नसल्याचा निर्वाळा दिला. राज्यात सध्याला राजकिय हालचालीस वेग आला असताना अजित पवार यांच्या पत्नीस उपमुख्यमंत्री करून राजकिय वातावरण शांत केले. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन या महिण्यात सहा तारखेपासून सुरू होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प यापुर्वी अजित पवार हे मांडत होते. त्यांच्या निधनाने अजित पवार यांचे खाते नियमानुसार काही काळासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असू शकते. त्यामुळे ते यदाकदाचित राज्याचा अर्थसंकल्प मांडतील असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्र राज्य तसे मोठे आहे. राज्याचा अर्थसंकल्प सुद्धा विचारपुर्वक मांडावा लागतो. सर्वसमतोलपना यात असावा लागतो. अजित पवार यांच्याकडे अर्थमंत्रालय होतेच त्यामुळे सहावेळा अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडला. अजून तरी कोण अर्थसंकल्प मांडेल हे निश्चित दिसून येत नाही. त्याच प्रमाणे अजित पवार यांच्यामृत्यूचे ठोस कारण बाहेर न आल्याने केवळ तर्कवितर्क काढले जात आहेत. विमानातील ब्लॅकबॉक्स सापडला असल्याने सत्य काय ते सर्वांना कळून येणार आहे. त्यामुळे एकदाचे कारण समजले की, सध्या चालू असलेल्या विविध चर्चेस विराम मिळणार आहे. काही झाले तरी पवार परिवारातील उपमुख्यमंत्रीपद शेवटी प्राप्त झाले ही मोठी समाधानाची बाब आहे. मुळात पवार कुटुंबिय मोठे आहे. सक्रिय राजकारणात आहेत. शरद पवार यांचे वजन अजून ही केंद्रात आहे. राज्यात त्यांना मानणारा वर्ग मोठा आहे. राज्यात अजित पवार यांच्यानिधनाने जी राजकिय पोकळी निर्माण झाली ती कोण व कशी भरून काढेल हा राष्ट्रवादीत प्रश्न सतावत होता, राज्यात अजित पवार यांनी मुंबई महानगरपालिकेत महायुतीत सहभाग न घेता ते स्वतंत्र लढले. त्याच प्रमाणे शरद पवार व अजित पवार एकत्र येण्याबाबत अनेक बैठका झाल्याचे सांगण्यात येत आहे. अजित पवार यांचे विश्वासू अजूनतरी गप्प दिसून येत आहेत. त्यामुळे पवार कुटुंबियात सर्व काही गुपचिपच बाबी चालू असतील असेच दिसून येते. आज राज्याला माहिती झाले की, सुनेत्रा पवार सरकारमध्ये सामिल झाल्या व उपमुख्यमंत्री बनल्या आहेत. ही बाब शरद पवार यांना माहिती नसते हे काही मनाला पटणारे नाही. शरद पवार यांच्याकन्या सुप्रिया ह्या गप्प आहेत. त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. बारामतीकर अजून ही अजित पवार यांच्या दु:खातून बाहेर आले नाहीत. जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणुक प्रक्रिया चालू आहे. प्रचार शांततेत चालू असून कोणीही स्पिकर किंवा गाजावाजा करीत प्रचार करीत नाहीत तर घराघरी जावून प्रचार हाती घेतला जात आहे. राज्यात अजित पवार यांचे आमदार अधिक आहेत. सत्तेत आहेत. त्यामुळे सर्व बाबी विचारपुर्वक निर्णय होतील. अजित पवार कुटुंबियावर मोठे संकट कोसाळले असले तरी पक्षासाठी विचारपुर्वक निर्णय घेतला गेला आहे. अजित पवारांचे सहकारी मंत्रीमंडळात आहेत. वास्तविक अजित पवार यांचे विचार होते त्यांनी ते जाहिररित्या बोलून दाखविले होते ते म्हणजे मी सत्तेत मागचापुढचा विचार न करता जातो, कारण जनतेसाठी, विकासासाठी! हे अतिषय योग्य आहे. सत्तेबाहेर व सत्तेत यात बराच फरक आहे. सत्तेत राहुन जनतेला न्याय मिळवुन देता येतो. त्यामुळे ते भाजपासोबत गेलो, सकाळचा शपथविधी झाला. सहावेळा म्हणजे अंतापर्यंत राज्याचे उपमुख्यमंत्रीपदी राहीले. असो वास्तविक सुनेत्रा पवार यांचा निर्णय योग्य आहे. बारामतीकरांचा विकास साधायाचा झाला तर रडत बसणे योग्य नाही. त्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकप्रकिया चालू आहे. त्यामुळे सत्तेत अधिकाराने कामे करून घेता येतात. प्रशासन चालविता येते. पद हे सर्वात महत्त्वाचे असते. हे ओळखून त्यांचा निर्णय योग्य आहे. मुळात सुनेत्रा पवार ह्या राजकिय कुटुंबातील आहेत. माहेर तेर धाराशिव जिल्ह्यातील आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या भगीणी आहेत. आमदार व माजीमंत्री राणा जगजितसिंह पाटील यांच्या आत्या आहेत. त्याच प्रमाणे ज्या घरात दिले ते शरद पवार यांचे घर राजकिय वारसा असलेले आहेत. शरद पवार यांचे पुतणे अजित पवार यांच्याशी सुनेत्रा पवार यांचा विवाह झाला, त्यामुळे राजकिय वारसा असलेला परिवारातून सुनेत्रा पवार आहेत. त्या राजकारणात यशस्वी होतील. त्या विद्यमान खासदारही आहेत. त्यामुळे सामाजिक कार्याचा अनुभव त्यांना आला असेल. अजित पवार यांनीही त्यांना पक्ष कार्यात सहभागी होण्याचा अग्रह धरला होता. राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्याने राष्ट्रवादी पक्षात जे अस्थितरतेचे वातावरण दिसून येणार होते ते मावळणार आहे. राज्यात अजित पवार असताना काय घडणार होते तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार यासाठी हालचाली सुरू होत्या हे आता उघड झाले आहे. वास्तविक जे काही बाब आहे ही कुटुंबातील आहे. कुटुंब अंतर्गत आहे. काका-पुतण्यामधील चर्चा होणे स्वाभाविक आहे. परंतु सुनेत्रा पवार यांनी जो धाडसी निर्णय घेतला याला तोड नाही. सर्वात मोठे दु:ख बाजूला सारून जनतेसाठी, बारामतीच्या विकासासाठी धाडसी पावुल स्विकारले. राज्याचे उपमुख्यमंत्रीपद मोठे आहे. आता कसे हाताळतील हे काही दिवसानंतर कळून येणार आहे. राज्याला पहिल्यांदाच एक महिला उपमुख्यमंत्री विराजमान झाल्याचे दिसून येत आहे. अतिषय कठिण परिस्थितीत जो निर्णय घेतला याचे कौतुक होणे स्वाभाविक आहे. यामुळे राष्ट्रवादी पक्षातील नेते स्थिरावले आहे. कार्यकर्त्यांच्या मनात जे काहूर दिसून येत होते ते स्थिरावले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे अभिनंदन असून ते निश्चित राज्याच्या विकासात हातभार लावतील. एक वेगळी चमक दाखवितील. त्याच्या भावी कार्यास सदिच्छा आहेत. त्यांनी मनात मोठे दु:ख ठेवून धाडसी निर्णयाचे कौतुक झाले पाहिजे.

# लेक वाचवा : लिंगगुणोत्तर समतोलासाठी कायदा,समाज आणि आपण

धाराशिव जिल्हा हा ''बेटी बचाओबेटी पढाओ'' या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असून, निती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा उपक्रमांतर्गत विशेष लक्ष दिला जाणारा जिल्हा आहे.निती आयोगाच्या महत्त्वाच्या निर्देशांकांपैकी लिंगगुणोत्तर हा एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक निर्देशांक आहे.मात्र गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यात मुलींच्या जन्माचे प्रमाण सातत्याने घटत असल्याचे चित्र दिसून येत आहे.ही बाब अत्यंत चिंताजनक असून, भविष्यात असेच लिंगगुणोत्तर घटत राहिल्यास समाजात मुला-मुलींमध्ये गंभीर असमतोल निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे जिल्ह्यात लिंगगुणोत्तर समतोल राखणे हे अत्यावश्यक बनले आहे.गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र ( गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायदा अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.लिंगगुणोत्तर वाढविणे तसेच गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपात रोखण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सोनोग्राफी केंद्र चालक,गर्भपात केंद्र चालक,खाजगी व शासकीय स्त्रीरोगतज्ज्ञ,, , तसेच सर्व शासकीय व खाजगी डॉक्टर यांच्यासाठी कार्यशाळा व बैठका वेळोवेळी आयोजित करण्यात येत आहेत.

तालुकास्तरावर व प्राथमिक आरोग्य केंद्र पातळीवर अंगणवाडी सेविका, एएनएम व आशा कार्यकर्ती यांच्या संयुक्त बैठका घेण्यात येत आहेत. गावनिहाय लिंगगुणोत्तराची माहिती संकलित केली जात असून जिल्ह्यातील प्रत्येक सोनोग्राफी व एमटीपी केंद्रांची त्रैमासिक तपासणी केली जाते.आवश्यकतेनुसार क्रॉस इन्स्पेक्शन करण्यात येते तसेच गुप्त पद्धतीने बनावट रुग्ण पाठवून गर्भलिंग निदान होत आहे का, याचीही काटेकोर तपासणी केली जाते.

**आपण आपल्या कार्यक्षेत्रात काय करू शकतो**

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायदा या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक सोनोग्राफी केंद्र कायद्यातील नियम व तरतुदी पाळत आहे की नाही,यावर देखरेख ठेवण्यासाठी समुचित अधिकारी व सल्लागार समित्या कार्यरत आहेत.या यंत्रणांना निर्भयपणे काम करता यावे यासाठी सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे.

समाजात मुलींची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी विविध सभांमधून प्रबोधन करता येईल.या समस्येच्या मुळाशी असलेल्या पुरुषप्रधान मानसिकता,पैशाच्या हव्यासातून होणारे गैरप्रकार यावर स्पष्टपणे चर्चा करणे गरजेचे आहे. प्रभाग व गाव पातळीवर लिंगनिहाय जन्मनोंदणीची पडताळणी करून उपलब्ध माहिती सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करता येईल.




प्रसारमाध्यमांचा सहभाग घेऊन जनजागृती अधिक प्रभावीपणे करता येईल. गावातील महिला मंडळे, युवक मंडळे यांचा सहभाग घेऊन ''मुलगाच हवा'' ही मानसिकता बदलण्यासाठी विशेष प्रयत्न करता येतील.गर्भलिंग निवडीशी संबंधित सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर, रेडिओलॉजिस्ट,दवाखाने किंवा प्रयोगशाळांबाबत माहिती मिळाल्यास पुराव्यांसह समुचित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे.

**कायदा पुरेसा नाही,मानसिकता बदलणे गरजेचे आहे**

मुलींना जन्मालाच न घालण्याची मानसिकता समाजात खोलवर रुजलेली आहे.केवळ कायदा करून ही समस्या संपणार नाही.कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसोबतच स्त्रीविरोधी पुरुषप्रधान मानसिकता बदलणे,तसेच मुलींमध्ये निर्णयक्षमता,आत्मविश्वास आणि स्वावलंबन विकसित करणे आवश्यक आहे.मुलींचे शिक्षण, क्षमता विकास आणि संधींची उपलब्धता यावर आपला निधी व वेळ सकारात्मकरीत्या वापरणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**गर्भलिंग निदानाचे गंभीर सामाजिक परिणाम**

गर्भलिंग निदानामुळे निसर्गाचे संतुलन बिघडत असून समाजाचा नैतिक पाया ढासळत आहे.देशातील काही भागांत गेल्या १०-१५ वर्षांत मुलींचा जन्मच झालेला नाही,अशी भयावह स्थिती निर्माण झाली आहे. मुलींचा व्यापार,लैंगिक शोषण वाढत आहे.काही ठिकाणी मुलींना जनावरांसारखे विकत घेतले जाते. स्त्रियांवरील अत्याचार, हिंसाचार वाढण्याची शक्यता आहे. बहुपतीत्वाच्या प्रथा लादल्या जात आहेत. गुजरात,राजस्थान आणि महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत लग्नासाठी मुली न मिळाल्याने इतर राज्यांतून फसवणूक करून मुली आणल्या जात आहेत.

**का नकोशा वाटतात मुली**

मुलगा हाच वंशाचा दिवा आणि मुलगी परक्याचे धन ही मानसिकता आजही समाजात आहे.हुंडा पद्धतीचा भस्मासूर,मुलींवर केलेल्या खर्चाचा ''परतावा नाही'' असा गैरसमज,रुढी-परंपरा आणि पुरुषप्रधान संस्कृती या सर्व कारणांमुळे मुलींकडे दुर्लक्ष होते.

**सोनोग्राफी तंत्रज्ञानाचा गैरवापर :**

गर्भातील बाळाचे लिंग जाणून घेऊन मुलगी असल्यास गर्भपात करणे म्हणजे गर्भलिंग निवड.अल्ट्रासाउंड सोनोग्राफीचा या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाला.१९९१ ते २०११ च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार देशातील स्त्री-पुरुष प्रमाण झपाट्याने घटले आहे.

**गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान तंत्र कायदा काय सांगतो**

सन १९९४ साली देशभर लागू झालेल्या या कायद्यानुसार गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर गर्भलिंग निवड व त्याची जाहिरात करण्यास बंदी आहे.कायद्याचा भंग करणाऱ्यांसाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे.पहिल्या गुन्ह्यासाठी संबंधित डॉक्टरला ३ वर्षांपर्यंत कैद,१० हजार रुपये दंड व मेडिकल कौन्सिलमधील नोंदणी निलंबन.

पुनरावृत्ती झाल्यास ५ वर्षांपर्यंत कैद,५० हजार रुपये दंड व कायमस्वरूपी नोंदणी रद्द.गर्भलिंग निवडीसाठी दबाव आणणाऱ्या व्यक्तीस ३ वर्षांपर्यंत कैद व ५० हजार रुपये दंड या कायद्याखाली गर्भवती महिला निर्दो ष मानली जाते

**तक्रार कुठे करावी**

राज्य सरकारने नियुक्त केलेल्या जिल्हा किंवा तालुका स्तरावरील समुचित प्राधिकाऱ्यांकडे तक्रार करता येते.यासाठी .. ही सार्वजनिक आरोग्य विभागाची वेबसाईट उपलब्ध असून,येथे नाव न सांगता तक्रार करता येते.तसेच टोल फ्री क्रमांक १८००-२३३-४४७५/ १०४ वरही संपर्क साधता येतो.

'बेटी बचाओबेटी पढाओ' अंतर्गत गावपातळीवरील उपक्रम,व्हिलेज हेल्थ प्लॅनमध्ये हा विषय समाविष्ट करून 'आकडे बोलतात' फलक, बालिका जन्मोत्सव,युवासंसद, गरोदर मातांसाठी शपथ कार्यक्रम, नवविवाहित दांपत्यांची शपथ,लेक लाडकी अभियान,महिला ग्रामसभा, जनजागृती फेऱ्या,एक मुलगी-एक झाड उपक्रम राबवता येतो.यामुळे समाजात स्त्री-पुरुष समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचतो. मुली आणि स्त्रियांना सन्मानाने जगता यावे,यासाठी सामाजिक परिवर्तन घडवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.गर्भलिंग निदानासारख्या अमानवी प्रथांना आळा घालण्यासाठी कायदा, प्रशासन आणि सजग नागरिक यांचा एकत्रित प्रयत्नच यशस्वी ठरू शकतो.लेक वाचली तरच समाज वाचेल, ही जाणीव प्रत्येकाच्या मनात रुजणे गरजेचे आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

# आरोग्यासाठी वरदान आहे लाल तांदळाचे पाणी, जाणून घ्या फायदे आणि सेवन करण्याची पद्धत



आयुर्वेदानुसार, लाल तांदळाचे पाणी हे बाह्य आणि अंतर्गत आरोग्यासाठी फायदेशीर आहे. लाल तांदूळ पांढऱ्या तांदळापेक्षा अधिक पौष्टिक आहे. त्यात मुबलक प्रमाणात प्रथिने, आहारातील फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि झिंक, कॅल्शियम, लोह आणि पोटॅशियम सारखी खनिजे असतात. आज आपण लाल तांदळाचे पाणी पिण्याचे फायदे जाणून घेऊया

**थकवा दूर करते–**

लाल तांदळाचे पाणी पिल्याने शरीर हायड्रेट आणि थंड होण्यास मदत होते. शिवाय, ते शरीराला ऊर्जा देण्यास आणि थकवा दूर करण्यास मदत करते. लाल तांदळाचे पाणी शरीराला लगेच ऊर्जा प्रदान देते.

**तापासाठी फायदेशीर–**

ताप किंवा कणकण आल्यास शरीराचे तापमान कमी करण्यास मदत करण्यासाठी आयुर्वेदिक औषधांमध्ये लाल तांदळाचे पाणी पारंपारिकपणे वापरले जाते. ते शरीराला आतून थंड करते आणि शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास मदत करते.

**त्वचेसाठी फायदेशीर–**

पोषक तत्वांनी समृद्ध असलेले हे लाल तांदळाचे पाणी आवश्यक पोषण प्रदान करण्यास आणि त्वचेला नवी चमक देण्यास मदत करू शकते. हे पाणी ऍलर्जी, जळजळ आणि मुरुमांसारख्या त्वचेच्या समस्या कमी करण्यास देखील मदत करते.

**पचनाच्या समस्या दूर करते–**

लाल तांदळाच्या पाण्यात कार्बो हायड्रेट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे चांगली असतात. जी पचन सुधारण्यास मदत करू शकतात. नियमित सेवनाने अपचन, बद्धकोष्ठता आणि अतिसाराची लक्षणे कमी करण्यास मदत होते.

**केस गळती कमी करते–**

लाल तांदळाचे पाणी केसांना आतून पोषण देते. त्यात इनोसिटॉल, एक कार्बो हायड्रेट असते जे केसांना मजबूत करण्यास आणि वाढीस प्रोत्साहन देण्यास मदत करू शकते. ते केसांच्या मुळांना आतून पोषण देते.हे पाणी सेवन करण्यासोबतच तुम्ही ते तुमच्या केसांना देखील लावू शकता. यामुळे कोंडा कमी होण्यास आणि फाटे फ ुटण्याची समस्या कमी करते.

लाल तांदळाचे पाणी कसं प्यायचं?

लाल तांदळाचे पाणी बनवण्यासाठी १ कप लाल तांदूळ घ्या आणि ते चांगले धुवा. नंतर, ६ पट पाणी घाला आणि हलके गरम करा. तांदूळ झाकून ठेवा आणि २-३ तास भिजवू द्या. तांदूळ गाळून घ्या आणि नंतर पाणी प्या. किंवा हवे असल्यास तुमच्या त्वचेवर आणि केसांवर वापरा.

# व्हिटॅमिन डी कमी झाले तर हाडं, पाठ आणि मेंदूवर कसा होतो परिणाम?

हिवाळा सुरू होताच सूर्यप्रकाशाचा संपर्क कमी होतो, शरीर जाड कपड्यांनी पूर्ण झाकलेले राहते आणि दिवसाचा बराचसा वेळ घरात जातो. त्यामुळे त्वचेवर सूर्य किरण कमी पडतात आणि शरीरात व्हिटॅमिन डीचे प्रमाण घसरू लागते. भारतासारख्या सूर्यप्रकाश असणाऱ्या देशातही ७० ते ९० टक्के लोकसंख्येमध्ये व्हिटॅमिन डीची कमतरता आढळते, असा अनेक संशोधनांचा निष्कर्ष आहे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते ही केवळ जीवनसत्त्वाची कमतरता नसून हाडांची ताकद, रोगप्रतिकारशक्ती, स्नायूंचे आरोग्य आणि मेंदूच्या कार्यक्षमतेशी थेट जोडलेली गंभीर आरोग्य समस्या आहे.

**शरीरात व्हिटॅमिन डीची भूमिका काय?**

व्हिटॅमिन डी शरीरातील कॅल्शियम शोषण सुधारते, हाडे म जबूत ठेवते आणि मेटाबॉलिझम संतुलित करण्यात मदत करते. याची कमतरता वाढली तर धूदस्सरम्र सारखी स्थिती निर्माण होऊ शकते, ज्यात हाडे मऊ आणि दुर्बळ होतात, हलक्याशा दाबानेसुद्धा पाठ, सांधे आणि स्नायूंमध्ये असह्य वेदना होतात. Journal of Investigative Medicine मधील अध्ययन सांगते की व्हिटॅमिन डी इम्युन पेशी ठेवून शरीराचे संरक्षण मजबूत करते. American Journal of Clinical Nutrition नुसार व्हिटॅमिन डी शिवाय शरीर केवळ १०-१५ टक्के डायटरी कॅल्शियम शोषू शकते, त्यामुळे हाडांची घनता कमी होऊन फ्रॅक्चरचा धोका वाढतो. British Journal of Psychiatry मध्ये प्रकाशित मेटा-एनालिसिसनुसार व्हिटॅमिन डी कमी असणार्यांमध्ये डिप्रेशनचा धोका जवळपास दुप्पट आढळतो. त्यामुळे हिवाळ्यात या जीवनसत्त्वाची योग्य पातळी राखणे अत्यावश्यक ठरते.

**मशरूम – शाकाहारींसाठी नैसर्गिक व्हिटॅमिन डी**

मशरूम सूर्यप्रकाशात किंवा i% लाईटमध्ये ठेवल्यास त्यातील एर्गोस्टेरॉल व्हिटॅमिन डी २ मध्ये रूपांतरित होते. १०० ग्रॅम सन-ड्राई मशरूममधून सुमारे ४०० घ्ळ व्हिटॅमिन डी मिळू शकते, असे संशोधन सांगते. बटन, ऑयस्टर आणि शिटाके मशरूम भारतीय स्वयंपाकात सहज वापरता येतात. नियमित आहाराचा भाग बनवल्यास हाडांची ताकद टिकते, स्नायू बळकट होतात आणि हिवाळ्यात जाणवणाऱ्या वेदनांवरही नियंत्रण मिळू शकते.

**फॅटी फिश – डी ३ आणि ओमेगा-३चे दुहेरी फायदे**

मॅकेरल, हिलसा, रोहू आणि सार्डिन सारख्या फॅटी फिशमध्ये व्हिटॅमिन डी ३ मुबलक प्रमाणात असते. १०० ग्रॅम ग्रिल्ड मॅकेरलम धून साधारण ३६०ते ५०० घ्ळ व्हिटॅमिन डी मिळते. संशोधनानुसार नियमित फिश सेवन करणाऱ्यांमध्ये व्हिटॅमिन डी चे प्रमाण २० ते ३० टक्क्यांनी चांगले राहते. त्यामुळे मुलांमध्ये रिकेट्स टाळण्यात, तर वयस्करांमध्ये ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी करण्यात या माशांचा आहारातील समावेश अत्यंत उपयुक्त ठरतो.

**अंडी – रोजच्या आहारातील सोपा स्त्रोत**

मोठ्या आकाराच्या एका अंड्यात सुमारे ४० घ्ळ व्हिटॅमिन डी असते आणि त्याचे मुख्य प्रमाण योल्कमध्ये आढळते. फ्री-रेंज किंवा देशी अंड्यांमध्ये हे प्रमाण अधिक असल्याचे अभ्यास दर्शवतात. हिवाळ्यात दररोज १ ते २ अंडी खाल्ल्यास व्हिटॅमिन डी सोबत प्रोटीन आणि कोलीन यांचाही लाभ मिळतो. हे घटक स्नायूंची ताकद, दिमागी कार्यक्षमता आणि एकूण शरीरस्वास्थ्यासाठी महत्त्वाचे मानले जातात.

**दूध, दही आणि पनीर –** फोर्टिफाइड डेअरीचा महत्त्वाचा वाटा

फोर्टिफाइड दूध, दही आणि पनीर हे कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी चे संतुलित स्रोत ठरतात. दररोज दूध किंवा दही घेतल्यास १०० ते १२० घ्ळ व्हिटॅमिन डी मिळू शकते. संशोधन सांगते की डेअरी प्रोडक्ट्स शरीरातील व्हिटॅमिन डीचे शोषण सुधारतात. दहीतील प्रोबायोटिक्स पचनशक्ती वाढवतात, ज्यामुळे पोषक घटकांचा उपयोग अधिक प्रभावीपणे होतो. दैनंदिन आहारात दूध, रायता किंवा पनीर सहजपणे समाविष्ट करता येते.

**मिलेट्स आणि हिरव्या भाज्या – हाडांना नैसर्गिक बळ**

रागी किंवा नाचणी शरीरातील कॅल्शियमचा वापर सुधारते तसेच हाडांना बळकटी देते. शेवग्याच्या शेंगा, मेथी, चवळीची भाजी किंवा राजगिरा यांसारख्या हिरव्या भाज्यांमध्ये कमी प्रमाणात का होईना, पण व्हिटॅमिन डी आणि इतर सूक्ष्म पोषक घटक आढळतात. नाचणीचा डोसा, नाचणीचा दलिया आणि हिरव्या भाज्यांचा आहारातील नियमित समावेश शाकाहाऱ्यांसाठी विशेषत: फायदेशीर ठरतो.

**आहाराबरोबर सूर्यप्रकाशही तेवढाच गरजेचा**

केवळ आहारावर अवलंबून राहणे पुरेसे नाही. आठवड्यात किमान १५ ते २० मिनिटे सकाळच्या सौम्य सूर्यप्रकाशात राहणे, नियमित चालणे किंवा बाहेरील शारीरिक हालचाल आवश्यक आहे. गंभीर वेदना, सतत थकवा, स्नायू आखडणे, वारंवार सर्दी-खोकला, मूड स्विंग्स यांसारखी लक्षणे दिसत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि आवश्यक असल्यास सप्लिमेंट्स घ्यावेत. योग्य काळजी, संतुलित आहार आणि नियंत्रित जीवनशैली ठेवली तर हिवाळ्यातही शरीरातील व्हिटॅमिन डी चे प्रमाण संतुलित राहू शकते आणि हाडे-सांधे मजबूत राहतात.

# सतत स्क्रीनचा वापर करुन डोळे थकले असतील तर न चुकता खा हे आठ पदार्थ, चष्म्याचा नंबरही होईल आपोआप कमी

बदललेल्या जीवनशैलीत लॅपटॉप, मोबाईल यांसारख्या स्क्रीनसम ोर तासन्तास काम करणे महत्वाचे झाले आहे. याचा थेट परिणाम डोळ्यांवर होतो. सततचा प्रकाश, ताण, धूळ आणि कोरडेपणामुळे डोळे जळजळणे, धूसर दिसणे, संवेदनशीलता वाढणे अशी लक्षणं जाणवू लागतात. तज्ज्ञांच्या मते योग्य आहार घेतल्यास डोळ्यांवरील ताण कमी होतो आणि दृष्टीही सुधारते. पोषक घटक डोळ्यांना नैसर्गिक संरक्षण देतात. ओमेगा-३, व्हिटॅमिन अ, उ, ए आणि झिंक यांचा आहारात समावेश केल्यास दृष्टी आरोग्य मजबूत राहते.

**डोळ्यांसाठी उपयुक्त आठ महत्त्वाचे पदार्थ**

ओमेगा-३ युक्त मासे: सॅल्मन, टूना, सार्डिनसारखे मासे डोळ्यांचा कोरडेपणा कमी करतात तसेच रेटिनाची कार्यक्षमता वाढवतात. स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवणाऱ्यांसाठी हे विशेष फायदेशीर मानले जातात. सुकामेवा व डाळी: बदाम, काजू, शेंगदाणे आणि विविध डाळींमधील नैसर्गिक अँटीऑक्सिडंट्स डोळ्यांच्या ऊती मजबूत करतात. वयानुसार दृष्टी मंदावण्याचा धोका कमी होतो. हिरव्या भाज्या: पालक, ब्रोकली, सलाडसारख्या भाज्यांमध्ये ल्यूटिन आणि झेक्सॅन्थिन हे घटक असतात, जे प्रकाशामुळे होणारी हानी कमी करतात आणि दृष्टी स्थिर ठेवतात. बीटा कॅरोटीनयुक्त पदार्थः रताळे, स्क्वॅश, पालक आणि टरबूज यांसारखे पदार्थ शरीरात व्हिटॅमिन अ तयार करण्यात मदत करतात. हे घटक कमी प्रकाशात पाहण्याची क्षमता वाढवतात. गाजर – व्हिटॅमिन अ: गाजर नियमित खाल्ल्यास रेटिना मजबूत होतो आणि डोळ्यांचा कोरडेपणा कमी होतो. व्हिटॅमिन ण भरपूर फळे: संत्रा, लिंबू, कीनू, स्ट्रॉबेरी आणि टोमॅटो यांसारखी फळे डोळ्यांचे पेशी फ्री-रॅडिकल्सपासून सुरक्षित ठेवतात. वयामुळे होणाऱ्या मोतीबिंदूपासूनही संरक्षण मिळते. व्हिटॅमिन एः अवोकॅडो, बदाम आणि सूर्यफुलाच्या बियामधील व्हिटॅमिन ए डोळ्यांच्या पेशींना होणारे नुकसान कमी करते. झिंकयुक्त पदार्थः राजमा, पोल्ट्री, फोर्टिफाइड धान्यांतील झिंक रेटिनाला संरक्षण देतं आणि दृष्टी स्थिर ठेवण्यास मदत करतं.

**तज्ज्ञांचा सल्ला**

योग्य आहार डोळ्यांना ताकद देतो; मात्र सतत जळजळ, धूसरपणा किंवा वेदना जाणवल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**तळटीप :** हा मजकूर संकलित आहे. प्रयोग करण्याआधी वैद्यकीय सल्ला घेणे हिताचे आहे.

# वेदनेशिवाय सहज निघून जातील शरीरावरील अनावश्यक केस!

वाटीभर साखर आणि लिंबाच्या रसापासून बनवा घरगुती वॅक्स शरीरावर वाढलेले अनावश्यक केस काढण्यासाठी कोणत्याही केमिकलयुक्त वॅक्सचा वापर न करता घरी बनवलेले वॅक्स वापरावे. यामुळे त्वचेला कोणतीही हानी पोहचणार नाही. चला तर जाणून घेऊया वॅक्स बनवण्याची सोपी कृती.

कोणत्याही वेदनेशिवाय सहज निघून येतील शरीरावरील अनावश्यक केस! वाटीभर साखर आणि लिंबाच्या रसापासून बनवा घरगुती वॅक्स

कोणत्याही वेदनेशिवाय सहज निघून येतील शरीरावरील अनावश्यक केस! वाटीभर साखर आणि लिंबाच्या रसापासून बनवा घरगुती वॅक्स

वाढते प्रदूषण, धूळ, माती, कडक सूर्यप्रकाश इत्यादी अनेक गोष्टींमुळे शरीरावर त्वचा खूप जास्त टॅन होते आणि हात पाय काळे वाटू लागतात. याशिवाय सर्वच महिला शरीरावर वाढलेला अनावश्यक केस कमी करण्यासाठी सतत काहींना काही करत असतात. कधी वॅक्स करून घेतले जाते तर कधी बाजारात उपलब्ध असलेल्या महागड्या लेझर ट्रीटमेंट केल्या जातात. लेझर ट्रीटमेंट केल्यामुळे शरीरावर वाढणारे केस पूर्णपणे काढून टाकले जातात. मऊ आणि मुलायम त्वचेसाठी पार्लरमधल्या वेदनादायी वॅक्सिंगचा वापर केला जातो. पण त्यामध्ये असलेल्या केमिकलमुळे त्वचेवर लालसरपणा वाढणे किंवा इन्फेक्शन होण्याची जास्त शक्यता असते. याशिवाय काहीवेळा वॅक्सिंग करताना त्वचा ताणल्यामुळे रक्त येणे किंवा त्वचेवर मोठे मोठे



फोड देखील येतात. त्यामुळे कायमच बाजारात उपलब्ध असलेल्या महागड्या वॅक्सिंगचा वापर करण्याऐवजी घरगुती उपाय करून शरीरावर वाढलेले अनावश्यक केस काढून टाकावे. आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये वेदनेशिवाय वॅक्स करण्यासाठी सोपी पद्धत सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

चेहऱ्यावरील सुरकुत्या कायमच्या होतील गायब! एक चमचा तुपाचा 'या' पद्धतीने करा वापर, त्वचा होईल तेजस्वी

त्वचेवरचे नको असलेले केस काढण्यासाठी घरगुती वॅक्स:

घरगुती पद्धतीने वॅक्स तयार करण्यासाठी सर्वप्रथम, पॅनमध्ये साखर, लिंबाचा रस आणि मध करून मंद आचेवर शिजवून घ्या. सर्व मिश्रण व्यवस्थित शिजल्यानंतर चमच्याने सतत ढवळत राहा. यामुळे पॅनला साखर चिकटणार नाही. तयार केलेले वॅक्स तुम्ही काचेच्या बरणीमध्ये साठवून ठेवू शकता. वॅक्स तयार झाल्यानंतर काढून घ्या. वॅक्स करण्यासाठी सर्वप्रथम, कोमट पाण्याने त्वचा स्वच्छ करून घ्या. यामुळे त्वचा कोरडी होईल आणि त्वचेवरील घाम नष्ट होऊन जाईल.त्यानंतर तयार केलेले वॅक्स केसांच्या विरुद्ध दिशेने लावून वॅक्स लावलेल्या भागावर स्ट्रीप लावून हलक्या हाताने ओढा. यामुळे पायांवरील केस सहज निघून येतील आणि त्वचा स्वच्छ दिसेल.

२० रुपयांमध्ये घरीच तयार करा नैसर्गिक बॉडी स्क्रबिंग! डेड स्किन निघून जाण्यासोबतच टॅनिंग होईल आठवडाभरात कमी

बाजारात उपलब्ध असलेल्या वॅक्समध्ये वेगवेगळ्या केमिकल युक्त प्रॉडक्टचा वापर केला जातो. यामुळे त्वचेला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे महागडे वॅक्स किंवा ट्रीटमेंट करण्याऐवजी घरगुती वॅक्स तयार करावे. लिंबाच्या रसात असलेले नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म आणि साखरेचे चिकट टेक्स्चर यामुळे त्वचेवरील केस सहज निघून येतात. लिंबामध्ये असलेले नैसर्गिक घटक त्वचेवरील टॅन कमी करताना आणि त्वचेवरील नैसर्गिक चमक कायम टिकवून ठेवण्यास मदत करतात.

**टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी**

# पचनसंस्था निरोगी ठेवण्याचे उपाय



पौष्टिक आणि फायबरयुक्त आहार: आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे, संपूर्ण धान्य, डाळी आणि सॅलडचा समावेश करा. फायबर बद्धकोष्ठता दूर करण्यास मदत करते.

भरपूर पाणी पिणे: दिवसभरात पुरेसे पाणी प्या, यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते आणि पचनक्रिया सुरळीत राहते.

अन्न नीट चावून खाणे: अन्न सावकाश आणि चावून खाल्ल्याने पचनक्रिया सुलभ होते.

प्रोबायोटिक्सचा वापर: दही आणि ताक यांसारखे प्रोबायोटिक पदार्थ आतड्यांतील चांगल्या बॅक्टेरियांची वाढ करतात आणि पचन सुधारतात.नियमित व्यायाम: दररोज किमान ३० मिनिटे चालणे, योगासने किंवा हलका व्यायाम पचनसंस्था मजबूत करण्यासाठी फायदेशीर आहे.वेळेवर जेवण: रात्रीचे जेवण शक्यतो ७ ते ८ च्या आत संपवा. जेवणानंतर लगेच झोपू नका, किमान १५ मिनिटे वज्रासनात बसा किंवा शतपावली (चालणे) करा.

तणावमुक्त राहणे: ताणतणावामुळे पचनक्रियेवर वाईट परिणाम होतो, त्यामुळे योगासने आणि ध्यानाचा सराव करा. टाळायच्या गोष्टीतळलेले, मसालेदार, आणि जंक फूड.अति प्रमाणात साखर. धूम्रपान आणि मद्यपान.

पचनासाठी घरगुती उपाय:

आले: गॅस आणि सिडिटीसाठी आले गुणकारी आहे.

जिरे आणि धणे: जेवणानंतर जिरे–धने पूड किंवा बडीशेप खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते.

# पगारावर जगणार्यांची कसरत केंद्रीय अंदाजपत्रकाकडून अपेक्षा




उद्या १ फेब्रुवारी २०२६ रोजी देशाचे केंद्रीय अंदाजपत्रक सादर होणार आहे. या अंदाजपत्रकाकडे पगारावर काम करणारा सर्वसामान्य माणूस मोठ्या अपेक्षेने पाहत आहे. कारण पगारदार माणसाचा कर पगारातून थेट कापला जातो. तो कर चुकवू शकत नाही, पुढे ढकलू शकत नाही. त्यामुळे सरकारकडून थोडा न्याय मिळावा, अशी अपेक्षा स्वाभाविक आहे.

आज बहुतेक नोकरदारांना दरवर्षी थोडीफार पगारवाढ मिळते, साधारण ८ ते १० टक्के; पण महागाईही तितकीच वाढते. घरभाडे, दवाखाना, शाळा, प्रवास या सगळ्याचा खर्च वाढतो. पगार वाढला तरी हातात येणारा पैसा फारसा वाढत नाही. उलट, पगार वाढल्यामुळे जास्त कराच्या पट्ट्यात (स्लॅबमध्ये) जावे लागते. यालाच ब्रॅकेट क्रीप म्हणतात.

सध्या प्रमाणित वजावटीनुसार १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना कर माफी मिळते; पण त्यापुढे कराचा बोजा लगेच वाढतो. त्यामुळे मध्यम पगाराचा माणूस अधिक कर भरतो, पण त्याच्या जीवनात फारसा बदल होत नाही. यामुळे प्रमाणित वजावट वाढवावी, अशी जोरदार मागणी आहे. सध्या ही सवलत ७५,००० रुपये आहे. ती १ लाख किंवा १.२५ लाख रुपये केली, तर नोकरदारांना कोणतेही कागद न देता थेट फायदा मिळेल. असे झाले, तर सुमारे १३ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न अनेकांसाठी जवळपास करमुक्त होऊ शकते. आणखी एक अपेक्षा म्हणजे जास्त कर लागणारा टप्पा थोडा पुढे न्यावा. सध्या २४ लाख रुपयांनंतर ३० टक्के कर लागतो. हा टप्पा ३० लाख रुपयांपर्यंत नेला, तर कुटुंबाची जबाबदारी असलेल्या मध्यमवर्गीय नोकरदारांना दिलासा मिळेल.

नवीन करपद्धतीत घरभाडे भत्ता (क्ठ–) आणि प्रवास भत्ता (ड्ढ–) बंद केल्यामुळे अनेकांना तोटा झाला आहे. शहरात राहणार्यांसाठी घरभाडे मोठा खर्च असतो. सरकारने या खर्चाची थोडी तरी दखल घ्यावी, अशी अपेक्षा आहे. निवृत्तीनंतरचा विचारही महत्त्वाचा आहे. सरकारी कर्मचार्यांना पेन्शनसाठी जास्त करसवलत मिळते. खासगी नोकरी करणार्यांनाही तीच सवलत मिळाली, तर ते भविष्याची चांगली तयारी करू शकतील.

पगारदार माणूस थोडीफार बचत शेअर, म्युच्युअल फंड किंवा घरात गुंतवतो. अशा गुंतवणुकीवरचे कर नियम वारंवार बदलू नयेत, एवढीच अपेक्षा आहे. सरकारपुढे खर्च आणि तुटीच्या मर्यादा आहेत हे खरे; पण देशातील कोट्यवधी पगारदार करदाते सरकारचा मोठा आधार आहेत. वर्षाला २०–३० हजार रुपयांचीही सवलत त्यांच्या घरगुती बजेटमध्ये मोठा फरक करू शकते. २०२६ चे अंदाजपत्रक गाजावाजा करणारे नको; पण सामान्य पगारदार माणसाला दिलासा देणारे असावे, हीच खरी अपेक्षा.

उद्योगविश्वाच्या वास्तववादी अपेक्षा

उद्या सादर होणार्या केंद्रीय अंदाजपत्रकाकडे भारतीय उद्योगविश्व सावध आशावादाने पाहत आहे. जागतिक व्यापार तणाव, अमेरिकेतील संरक्षणवादी धोरणे आणि चीनकडून वाढत असलेली निर्यात स्पर्धा या पार्श्वभूमीवर उद्योगांना मोठ्या करसवलतींपेक्षा धोरणात्मक स्थैर्य, स्पष्ट नियम आणि प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित आहे.

वित्तीय तूट सुमारे ४.३ ते ४.४ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न असताना, गुंतवणूक आणि उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी निवडक; पण परिणामकारक उपाययोजना करण्याची संधी उपलब्ध आहे. 'विकसित भारत २०४७' या उद्दिष्टपूर्तीसाठी भांडवली खर्चाची सातत्यपूर्ण वाढ आणि खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन महत्त्वाचे ठरणार आहे.

प्राप्तिकर कायदा, २०२५ नंतर उद्योगांकडून सध्या कंपनी करदरात कपात करण्याची मागणी नाही. मात्र, किमान पर्यायी कर (च–ढ) कलम ११५गइ अंतर्गत सध्या सुमारे १७.४७ टक्के असून तो विवेकी पातळीवर आणण्याची अपेक्षा आहे. तसेच च–ढ क्रेडिट पुढील वर्षांत समायोजित करण्याबाबत अधिक सुलभता अपेक्षित आहे. शेअर बायबॅकवरील कररचनेतही (कलम ११५ट–) पूर्वीप्रमाणे कर कंपनीवरच आकारण्याचा विचार व्हावा, अशी उद्योगांची भूमिका आहे.

व्यवसाय रचनेत समानता आणण्याच्या दृष्टीने भागीदारी संस्था व एलएलपींसाठी २५ टक्के करदर लागू करण्याची मागणीही महत्त्वाची आहे. यामुळे चडचए आणि व्यावसायिक सेवा क्षेत्र अधिक स्पर्धात्मक होऊ शकते.जीएसटी बाबतीत दरमहा सुमारे १.८ लाख कोटी रुपयांचे स्थिर संकलन पाहता, करदर सुलभीकरण, अनुपालन प्रक्रिया सोपी करणे आणि लहान उद्योगांसाठी अँटी–प्रॉफिटिअरिंग तरतुदींना कालमर्यादा देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. केंद्रीय अंदाजपत्रक २०२६ कडून उद्योगांना मोठ्या घोषणा नकोत, तर स्थैर्य, स्पष्टता आणि विश्वास देणारे धोरण हवे आहे, असे समतोल अंदाजपत्रकच दीर्घकालीन गुंतवणूक आणि आर्थिक वाढीस पूरक ठरेल.

केंद्रीय अंदाजपत्रक : सोपे मराठी शब्द समजून घ्या–केंद्रीय अंदाजपत्रक २०२६ सादर होण्यापूर्वी 'महत्त्वाच्या संज्ञा सोप्या मराठीत समजून घेऊ. अंदाजपत्रक म्हणजे फक्त प्राप्तिकर सवलत किंवा वस्तू स्वस्त–महाग होणे नव्हे. त्यातील वित्तीय तूट, जीडीपी आदी आकडेवारी समजून घेण्यासाठी हे शब्द आवश्यक. बातम्या संपादित करताना शब्दसारखेपणा राहील. ठराविक शब्दशैली : अंदाजपत्रक (बजेट नव्हे), अर्थमंत्री (वित्तमंत्री नव्हे), प्राप्तिकर (इन्कमटॅक्स/आयकर नव्हे), उत्पादन शुल्क (एक्साईज नव्हे), सीमाशुल्क (कस्टम्स नव्हे). कर–शुल्क–उपकर–अधिभार असा वापरा. अंशदान (सबसिडी), अनुदान (ग्रँट), विवरणपत्रे (रिटर्न्स), परतावा (रिफंड), निवृत्तिवेतन (पेन्शन), उद्गम करकपात (टीडीएस), वस्तू व सेवाकर (जीएसटी). कंपनी कर (कॉर्पोरेट टॅक्स), समभाग व्यवहार कर (एसटीटी), किमान पर्यायी कर (मॅट).

महत्त्वाच्या संकल्पना सोप्या भाषेत :

वित्त विधेयक हा करदर–सवलतींचा मुख्य दस्तावेज. जीडीपी म्हणजे एकूण देशांतर्गत उत्पादन – देशातील वस्तू–सेवांचे बाजारमूल्य. जीएनपी म्हणजे जीडीपी + परदेशी कमाई वजा भारतातील परदेशी कमाई. आर्थिक वर्ष: एप्रिल ते मार्च. वित्तीय तूट ही कर्जाव्यतिरिक्त जमा कमी पडणे. महसुली तूट म्हणजे पगार–व्याजाचा खर्च जास्त. महसुली जमा ही कर–शुल्के. भांडवली खर्चातून रस्ते, यंत्रसामग्री उभे राहतात. भांडवली जमा ही विक्रीतून मिळणारी (उदा. सरकारी कंपन्या). तुटीचं अर्थसाह्य विकासासाठी उपयुक्त, पण चलनवाढ टाळावी. व्यापार संतुलन ही माल निर्यात–आयात फरक. बॅलन्स ऑफ पेमेंटमध्ये सेवा समाविष्ट. योजनांवरील खर्च हा शेती–विकासासाठी, योजनाबाह्य खर्च हा संरक्षण–व्याजासाठी. प्रत्यक्ष कर उत्पन्नावर (प्रोग्रेसिव्ह), अप्रत्यक्ष कर वस्तू–सेवांवर (जीएसटी). अंशदान ही सरकारी मदत, आर्थिक साह्य ही सवलतीच्या कर्जाचा तोटा भरून देणे.

**सी.ए चंद्रशेखर चितळे**
**(लेखक सनदी लेखापाल आहेत)**

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



स्पिनिंग–फायदे–० शरीरातील अतिरिक्त चरबीचं प्रमाण घटतं. तग धरण्याची क्षमता वाढते. एरोबिक्स–नृत्यातून व्यायाम व्हावा यासाठी एरोबिक्सची निर्मिती करण्यात आली. एरोबिक्समध्ये केल्या जाणाऱ्या विविध शारीरिक हालचालींमुळे व्यायाम करणाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण होतो आणि नृत्यामधून होणाऱ्या व्यायामामुळे मानसिक आनंदही प्राप्त होतो.


## २ Joke विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?


राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## ३ Message संदेश




Tourist = Ye kiska kankaal hai..? Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai.. Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..? Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## ४ Thought सुविचार



शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.

– कार्लाइल


**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।

रस्या: स्निग्धा: स्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया : ।।

अर्थ – जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या–चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत–बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म–मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




## थोडक्यात/ संक्षिप्त

### सूर्यकुमारने या मोठ्या विक्रमात धोनीला टाकलं मागे

नवी दिल्ली-टी-२० विश्वचषक २०२४ जिंकल्यानंतर रोहित शर्माने टी-२० मधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर सूर्यकुमार यादवची पुढील कर्णधार म्हणून घोषणा करण्यात आली. सूर्याच्या नेतृत्त्वाखाली भारताच्या टी-२० संघाने भारतात आणि परदेशातही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. भारताच्या टी-२० संघाचे कर्णधारपद स्वीकारल्यापासून टीम इंडियाने एकही टी-२० मालिका गमावलेली नाही. आगामी टी२० विश्वचषकापूर्वी, भारतीय संघाने न्यूझीलंडचा मालिकेत पराभव केला. या मालिकेनंतर सूर्याने कर्णधार म्हणून धोनीला मागे टाकत नवा विक्रम आपल्या नावे केला आहे.भारताने घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळली, जी त्यांनी ४-१ ने जिंकली. अखेरच्या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडचा ४६ धावांनी मोठा पराभव केला. भारताने न्यूझीलंडला विजयासाठी २७२ धावांचं लक्ष्य दिलं होत.

### भारताची अंडर वर्ल्डकप सेमीफायनलमध्ये धडक!

नवी दिल्ली-अंडर-१९ विश्वचषकात कट्टर प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळवला जात आहे. सेमीफायनलच्या दृष्टीने हा सामना खूप महत्त्वाचा होता. पण हा सामना संपण्यापूर्वीच भारताने अंडर-१९ विश्वचषकाच्या सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. बुलवायोच्या क्वीन्सस्पोर्ट्स क्लबमध्ये खेळवल्या जात असलेल्या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आणि संघाने २५२ धावांचं मोठं लक्ष्य दिलं. पण सामन्याचा निकाल लागण्याआधी भारत कसा क्वालिफाय झाला, जाणून घेऊया.ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान हे दोन्ही संघ अ गटातून तर इंग्लंडचा संघ ब गटातून सेमीफायनलसाठी पात्र ठरला आहे. भारत आणि पाकिस्तान संघांमध्ये सेमीफायनल सामन्यासाठी लढत होती. पण ३३.३ षटकं होताच पाकिस्तान भारताने दिलेलं लक्ष्य गाठण्यात अपयशी ठरला आणि भारताने सेमीफायनल गाठली.

### मॅचचा निकाल काही लागो! पाकिस्तानच्या सेमी फायनलच्या चाव्या भारताच्या हातात

नवी दिल्ली-आयसीसी अंडर १९ वर्ल्डकप सामन्यात पाकिस्तानने भेदक गोलंदाजी करून भारताचा डाव २५२ धावांवर ऑल आऊट केला आहे. त्यामुळे आता पाकिस्तानसमोर २५३ धावांचे लक्ष्य आहे. हे लक्ष्य गाठण्यासाठी पाकिस्तानकडे ५० ओव्हर आहेत. पण या ५० ओव्हरमध्ये जरी पाकिस्तानने लक्ष्य गाठून सामना जिंकला तरी काही फायदा होणार नाही. कारण तसे करून भारताला सेमी फायनल गिफ्ट दिल्यासारखं होईल. त्यामुळे पाकिस्तानला सेमी फायनल गाठण्यासाठी काय करावं लागेल? हे जाणून घेऊयात. खंर तर पहिल्यांदा टीम इंडियाच्या डावाबद्दल जाणून घेऊयात. पाकिस्तानने टॉस जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता.त्यामुळे टीम इंडिया प्रथम फलंदाजीला उतरली होती.

### भारत-द.आफ्रिका टी २० वर्ल्ड कप मॅच फक्त ३०० रुपयात

मुंबई -न्यूझीलंडविरुद्धच्या ५ टी-२० सामन्याच्या सीरिजमध्ये टीम इंडियाचा ४-१ ने दणदणीत विजय झाला आहे. टी-२० वर्ल्ड कपच्या आधी मिळालेला हा विजय टीम इंडियासाठी दिलासादायक आहे. या सीरिजनंतर आता भारतीय टीम पुढच्या ६ दिवसांमध्ये टी-२० वर्ल्ड कपच्या सामन्यासाठी मैदानात उतरणार आहे. टी-२० वर्ल्ड कपमध्ये भारताचा पहिला सामना ७ फेब्रुवारीला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर युएसएविरुद्ध होणार आहे.टी-२० वर्ल्ड कपच्या आधी भारतीय टीम दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वर्ल्ड कपचाच सराव सामना खेळणार आहे. हा सामना नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. बुधवार ४ फेब्रुवारीला संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरू होणार आहे. चाहत्यांना या सामन्यामध्ये प्रवेश मिळणार आहे, पण त्यासाठी तिकीट काढावं लागणार आहे.

# दिल्लीचा रोमांचक विजय आणि मुंबई डब्ल्यूपीएल २०२६ स्पर्धेबाहेर

**जेमिमा रॉड्रिग्जच्या दिल्लीची सलग चौथ्यांदा प्लेऑफ मध्ये धडक**

### मुंबई इंडियन्सचा खेळ खल्लास! दिल्लीच्या विजयाने हरमनप्रीतच्या संघाला बसला धक्का; एलिमिनेटरचं चित्र स्पष्ट

**नवी दिल्ली:** या विजयासह दिल्लीने 'एलिमिनेटर'मध्ये आपले स्थान निश्चित केले असून, या निकालामुळे मुंबई इंडियन्सचे आव्हान संपुष्टात आले.
: मुंबई इंडियन्सचा खेळ खल्लास! दिल्लीच्या विजयाने हरमनप्रीतच्या संघाला बसला धक्का; एलिमिनेटरचं चित्र स्पष्ट महिला प्रीमियर लीग (थझङ) २०२६ च्या साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने युपी वॉरियर्सवर ५ गडी राखून विजय मिळवला आहे. या विजयासह दिल्लीने 'एलिमिनेटर'मध्ये आपले स्थान निश्चित केले असून, या निकालामुळे गतविजेत्या मुंबई इंडियन्सचे यंदाच्या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.
दिल्लीचा सहज विजय, युपीचे आव्हान संपुष्टात-



१ फेब्रुवारी रोजी झालेल्या या महत्त्वाच्या सामन्यात युपी वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १२२ धावा केल्या होत्या. १२३ धावांचे हे माफक आव्हान दिल्ली कॅपिटल्सने १८.४ षटकांत ५ गडी गमावून पूर्ण केले. या विजयामुळे दिल्लीचे १० गुण झाले असून त्यांनी गुणतालिकेत दुसरे स्थान पटकावले आहे. दुसरीकडे, युपी वॉरियर्स टीम ८ सामन्यांत केवळ २ विजय मिळवू शकल्याने ४ गुणांसह गुणतालिकेत सर्वात तळाला राहिली आहे.
गतविजेत्या मुंबई इंडियन्सला बसला मोठा धक्का -
मुंबई इंडियन्सचे चाहते या सामन्यात युपी वॉरियर्सच्या विजयासाठी प्रार्थना करत होते, कारण तसे झाले असते तर नेट रनरेटच्या जोरावर मुंबई प्लेऑफमध्ये पोहा-चली असती. मात्र, दिल्लीने विजय मिळवल्यामुळे मुंबईचे ८ सामन्यांत ६ गुणांसह चौथे स्थान राहिले आणि त्यांचे स्पर्धेतील अस्तित्व संपले. २०२३ आणि २०२५ मध्ये विजेतेपद पटकावणाऱ्या मुंबईसाठी हा हंगाम निराशाजनक ठरला.
एलिमिनेटर आणि फायनलचे

### पुढील डब्ल्यूपीएलचे वेळापत्रक

साखळी फेरी संपल्यानंतर आता प्लेऑफचे चित्र स्पष्ट झाले आहे:एलिमिनेटर (३ फेब्रुवारी): वडोदरा येथील कोटांबी स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यात एलिमिनेटर सामना रंगणार आहे. फायनल (५ फेब्रुवारी): स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील आरसीबी संघ आधीच अंतिम फ रीत पोहोचला आहे. एलिमिनेटर जिंकणारा संघ ५ फेब्रुवारीला आरसीबीशी भिडणार आहे.
डब्ल्यूपीएलचा इतिहास: कोण ठरणार नवा चॅम्पियन?
डब्ल्यूपीएलच्या आतापर्यंतच्या प्रवासात मुंबई इंडियन्स (२०२३, २०२५) आणि आरसीबी (२०२४) यांनी विजेतेपद मिळवले आहे. यंदा आरसीबी आपले विजेतेपद राखणार की गुजरात किंवा दिल्ली यांपैकी एखादा नवा विजेता मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## १६८ बॉलमध्ये २५२ धावा, गंभीरने दुर्लक्ष केलेल्या खेळाडूने मॅच फिरवली, हारलेला सामना जिंकून दिला

नवी दिल्ली-रणजी ट्रॉफी सामन्यात एका पेक्षा एक रोमांचक सामने सूरू आहेत. अशाच एका सामन्यात टीम इंडियाचा मुख्य कोच गौतम गंभीरने दुर्लक्ष केलेल्या एका खेळाडूने अख्खी मॅच फिरवली आहे.या खेळाडूने ८५ बॉलमध्ये नाबाद १२० धावांची शतकी खेळी करून संघाला हारलेला सामना जिंकून दिला आहे. विशेष म्हणजे नुसता सामना नाही तर संघाला क्वार्टर फायनलच तिकीटही मिळवून दिलं आहे.त्यामुळे या विजयाची प्रचंड चर्चा सूरू आहे.खरं तर पंजाबने दुसऱ्या डावात कर्नाटक समोर २५२ धावांच लक्ष्य ठेवलं होतं.हे लक्ष्य गाठून कर्नाटक सामना जिंकेल असे वाटले देखील नव्हते. पण शेवटी कर्नाटकने करून दाखवले आहे. कर्नाटककडून केएल राहुल आणि कर्णधार देवदत्त पडीकल फलंदाजीसाठी आला होता. यावेळी राहुल १३ वर बाद झाला. त्यानंतर मयंक अगरवाल मैदानात आला



होता.यावेळी मयंक आणि पडीकलने डाव सावरला.नंतर पुढे जाऊन मयंक अगरवाल ५३ धावांची अर्धशतकीय खेळी करून बाद झाला.मयंक बाद झाल्यानंतर अनीश आणि रविचंद्रन झटपट आऊट झाले. त्यामुळे कर्नाटक सामना गमावते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पण कर्णधार पडीकलने डाव सावरून श्रेयस गोपालच्या मदतीने २७.५ ओलव्हरमध्ये हा सामना जिंकून दिला. या सामन्यात देवदत्त पडीकलने ८५ बॉलमध्ये १२० धावांची नाबाद खेळी केली होती. या खेळीत त्याने ५ षटकार आणि ६ चौकार लावले होते. त्याच्यासोबत गोपालने ३३ धावांची खेळी केली.या खेळीच्या बळावर कर्नाटकने सामना जिंकला. यातला देवदत्त पडीकल मागच्या अनेक सामन्यापासून शतकीय खेळी करून टीम इंडियाचे दार ठोठावतो आहे, पण गंभीर त्याची निवडच करत नाही आहे. त्यामुळे तो दुर्लक्षित राहिलेला आहे.
आता या विजयासह कर्नाटकने गट ब मध्ये आपला प्रवास शानदारपणे संपवला. संघाने एकूण २७ गुण मिळवले आणि दुसऱ्या स्थानावर राहून उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्रता मिळवली. मध्य प्रदेशने गटात अव्वल स्थान पटकावले, तर कर्नाटकने दमदार कामगिरीसह अंतिम आठमध्ये स्थान निश्चित केले. आता उपांत्यपूर्व फेरीत कर्नाटकसमोर आणखी मोठे आव्हान आहे.

## पाकिस्तान विरुद्ध वर्ल्ड कप सामन्यात वैभव सूर्यवंशीला झाली दुखापत

नवी दिल्ली-अंडर १९ वर्ल्ड कप २०२६ मध्ये सध्या भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात सुपर सिक्सचा महत्व-ाचा सामना सुरु आहे. रविवारी सुरु अस-लेला हा सामना भारत पाकिस्तान या दोन्ही संघांसाठी सेमी फायनलचं तिकीट मिळवण्याकरता महत्व-ाचा आहे. आयसीसी अंडर १९ वर्ल्ड कपच्या महत्वाच्या सामन्यात भारताचा स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी याला दुखापत झाली. तो डावी हॅम स्ट्रिंग पकडून पडला. त्यामुळे मैदानात लगेचच फिजिओला बोलवण्यात आलं आणि त्याला वैद्यकीय मदत देण्यात आली.



नेमकं काय घडलं?
भारताचे युवा स्टार पॉईंट्सवर उभे होते आणि जसा बॉल कव्हरच्या दिशेने गेला, वैभव हळूहळू खाली झुकू लागला पण त्याच्या डाव्या पायात वेदना झाल्या. फिजिओ लगेचच त्याच्या मदतीसाठी मैदानात धावले. त्याच्या डाव्या पायाच्या हॅमस्ट्रिंगमध्ये काही अडचण होती. काही स्ट्रेचिंग व्यायाम आणि पाणी प्यायल्यानंतर तो खेळण्यासाठी तंदुरुस्त झाला. सुदैवाने वैभवची दुखापत तेवढी गंभीर नव्हती.
भारताने पाकिस्तानला कितीचं लक्ष दिलं?
पाकिस्तानने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी फलंदाजी करताना स्वस्तात त्याची विकेट देऊन बसला. त्याने २२ बॉलमध्ये ३० धावा केल्या. पण पुल शॉट खेळण्याच्या प्रयत्नात लेफ्ट-आर्म सीमर मोहम्मद सैय्यमच्या गोलंदाजीचा शिकार ठरला. त्यानंतर आरोन जॉर्ज बाद झाला, त्यानंतर कर्णधार आयुष म्हात्रे शून्यावर बाद झाला. ऑलराऊंडर कनिष्क चौहान आणि खिलन पटेल यांच्यातील ५० धावांच्या जलद भागीद-ारीमुळे भारत २५२ धावांपर्यंत पोहोचला. कनिष्कने २९ बॉलमध्ये ३५ धावा केल्या, तर खिलनने १५ बॉलमध्ये २१ धावा केल्या. दोघांनी फक्त ५.१ ओव्हरमध्ये ५० धावा जोडल्या. वेदांत त्रिवेदीने ९८ चेंडूत ६८ धावांची संयमी खेळी केली भारताने पाकिस्तानला विजयासाठी २५३ धावांचे आव्हान दिले.
भारताची प्लेईंग ११ :
आरोन जॉर्ज, वैभव सूर्यवंशी, आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा, अभिज्ञान कुंडू (विकेटकिपर), वेदांत त्रिवेदी, आर एस अंबरिश, कनिष्क चौहान, खिलन पटेल, हेनिल पटेल, दीपेश देवेंद्रन.
पाकिस्तानची प्लेईंग ११ :
हमजा जहूर (विकेटकिपर), समीर मिन्हास, उस्मान खान, अहमद हुसेन, फरहान युसुफ (कर्णधार), हुजैफा अहसान, अली हसन बलोच, अब्दुल

## पाकिस्तान गोलंदाजाच्या ॲक्शनवर रागावला कॅमरुन ग्रीन, आईसीसी करणार कारवाई?

नवी दिल्ली-टी२० वर्ल्ड कप २०२६ पूर्वी पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात महत्व-ाची सीरिज सुरु असून यात पाकिस्तानने विजयी आघाडी घेतली आहे. दुसऱ्या टी २० सामन्यात पाकिस्तानने ऑस्ट्रेलिया ९० धावांच्या मोठ्या अंतराने पराभूत करून तीन सामन्याच्या सीरिजमध्ये २-० ने आघडी घेतली.



मात्र या सामन्यानंतर उस्मान तारिकच्या गोलंदाजीच्या ॲक्शनवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. स्वत: ऑस्ट्रेलियाचा फलंदाज कॅमरुन ग्रीन त्याच्या ॲक्शनमुळे रागावलेला दिसला, ज्याच्या बॉलवर तो कॅच आउट झाला होता. सध्या त्याचा व्हिडीओ सुद्धा व्हायरल होतोय.
कॅमरुन ग्रीन झाला कॅच आउट :
गद्दाफी स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या सामन्यात पाकिस्तानने ऑस्ट्रेलिया समोर १९९ धावांचं लक्ष ठेवलं होतं. मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजी समोर ऑस्ट्रेलियाचा संघ १०८ धावांवर बाद झाला. कर्णधार मिचेल मार्श (१८) च्या रूपाने पहिली विकेट २२ धावांवर पडली आणि पुढच्याच बॉलवर ट्रॅविस हेड सुद्धा बोल्ड झाला. तर जबरदस्त फलंदाज ट्रॅविस हेड फक्त ४ धावा करु शकला. ऑस्ट्रेलियाची पाचवी विकेट ५४ धावांवर पडली. कॅमरुन ग्रीनकडून अपेक्षा होती की त्याने चांगली फलंदाजी करावी, पण ११ व्या ओव्हरवर उस्मान तारिकच्या बॉलवर तो कॅच आउट झाला.
कॅमरुन ग्रीन १९ बॉलमध्ये ३५ धावा बनवून खेळत होते. उस्मान तारिकडावरे टाकलेल्या ११ व्या ओव्हरच्या पाचव्या बॉलवर ग्रीनने मोठा शॉट खेळण्याचा प्रयत्न केला, पण शादाब खानसाठी एका सोप्या कॅचचा चान्स बनला.

## वैभव, आयुष अपयशी ठरले, मग १८ वर्षाचा खेळाडू पाकिस्तानला एकटाच भिडला, गोलंदाजांच्या नाकात दम केला

नवी दिल्ली-आयसीसी अंडर १९ वर्ल्ड कपच्या सामन्यात आज पाकिस्तानच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करून भारताचे धडाधड विकेट काढले होते. यामध्ये वैभव सूर्यवंशी आणि आयुश म्हात्रे यांसारखे सर्व खेळाडू अपयशी ठरले होते. त्यामुळे एकीकडे पाकिस्तानचे गोलंदाज भारताच्या फलंदाजांवर हावी ठरत असताना तिकडे भारताचा १८ वर्षीय खेळाडू एकटाच नडला.पाकिस्तानला त्याने एकट्यानेच भिडून भार-ताचा डाव सावरला होता. त्यामुळे भारताचा डाव सावरला होता.

# बजेट २०२६: निर्मला सीतारमण यांनी क्रीडाप्रेमींची लावली लॉटरी!

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याकडून आज २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यात आला.त्यांनी सांगितले की, क्रीडा उपकरणे आता स्वस्त होणार आहेत. ज्यामुळे खेळाडू आणि तरुणांना चांगल्या सुविधा उपभोगता येतील. निर्मला सीतारमण यांनी क्रीडाप्रेमींची लावली लॉटरी(फोटो-सोशल मीडिया)
अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्प सादर केल आहे. या अर्थसंकल्पामध्ये क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सांगितले की क्रीडा उपकरणे आता स्वस्त होणार आहेत. ज्यामुळे खेळाडू आणि तरुणांना चांगल्या सुविधा उपभोगता येतील.
ग्रामीण भागात खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी, विशेषतः ग्रामीण भागात क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी एक मोठी योजना देखील त्यांनी जाहीर केली आहे. तसेच याव्यतिरिक्त, मुले आणि तरुण खेळाडूंना खेळांमध्ये रुची वाढवण्यासाठी, क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी अनेक पावले उंचणल्यात येतील. या उपक्रमात क्रीडा प्रतिभा विकास, प्रशिक्षक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, क्रीडा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा समावेश, स्पर्धा आणि लीग आयोजित करणे आणि क्रीडा प्रशिक्षणासाठी चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करणे यांचा समावेश असणार आहे.
अर्थमंत्र्यांनी महात्मा गांधी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत एसएमई (लघु आणि मध्यम उद्योग) साठी



### एसएमईसाठी तब्बल इतक्या कोटींचे पॅकेज केले जाहीर

१०,००० कोटी रुपयांची तरतूद देखील जाहीर केली, ज्यामुळे ग्रामीण तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि त्यांना क्रीडा क्षेत्रात त्यांची प्रतिभा विकसित करण्यास मोठी मदत होणार आहे.
यामुळे केवळ खेळाडूंना आर्थिक पाठबळ मिळणार नसून ग्रामीण स्तरावर खेळांचा दर्जा देखील सुधारण्यास मदत होईल. मुले आणि तरुण खेळांकडे अधिक आकर्षित होतील, ज्यामुळे भारतात खेळांचा सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. केंद्र सरकारचा हा उपक्रम क्रीडा क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि जागतिक स्तरावर भार-ताला क्रीडा केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल असल्याचे बोलले जात आहे.
भारत क्रीडा परिवर्तन घडणार
भारताकडे २०३० मध्ये १०० व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे यजमानपद असणार आहे. अहमदाबादमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच भारत २०३६ च्या ऑलिंपिक खेळांसाठी आपली दा-वेदारी मजबूत करत आहे. भारतीय क्रीडा क्षेत्रात या प्रकारे धोरणात्मक बदल घडत आहेत. १० वर्षांच्या विकासासाठी वचनबद्ध राहून, सरकार संरचनात्मक बदलाचा पाया रचण्यासाठी प्रयत्नशील आहे. याची खात्री करत आहे की खेलो इंडिया अभियाना ची भावना भारताच्या राष्ट्रीय ओळख आणि आर्थिक रचनेचा कायमचा भाग होणार आहे. आज, खेलो इंडिया हा केवळ एक क्रीडा स्पर्धाच नाही तर भारताच्या क्रीडा संस्कृतीला बळकटी देण्याचे, प्रतिभेला संधी देण्याचे आणि जागतिक स्तरावर देशाची स्पर्धात्मकता वाढविण्यासाठीचे प्रतीक आहे.

# पोहरेगाव जिल्हा परिषदेवर भाजपाचा झेंडा फडकवून नवा इतिहास घडवावा - आ. कराड

## कोळगाव, निवाडा, सिंधगाव आणि सांगवी येथील आ. कराड यांच्या प्रचार बैठकांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामीण भागात सर्वांगीण विकासाची गंगा आणायची असेल तर केंद्रात आणि राज्यात ज्याप्रमाणे भाजपची सत्ता आहे त्याप्रमाणे जिल्हा परिषदेत आणि पंचायत समिती भाजपाचीच सत्ता येणे गरजेचे असून गेल्या निवडणुकीत पोहरेगाव जिप गटाची जागा अपवाद वगळता रेणापूर तालुक्यातील सर्वच्या सर्व जागेवर भाजपाचा विजय झाला होता. यावेळी शतप्रतिशत भाजपा विजयी करा, पोहरेगाव जिल्हा परिषदेवर भाजपाचा झेंडा फडकवून नवा इतिहास घडवावा आणि पराभवाची परंपरा नष्ट करावी. कोणत्याही गावातील विकासाचे एकही काम शिल्लक ठेवणार नाही असे भाजपचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

भारतीय जनता पार्टीचे पोहरेगाव जिल्हा परिषद गटाचे उमेदवार सौ. मनिषा दशरथ सरवदे, पोहरेगाव पंस गणातील आकाश राजेंद्र भूतके आणि निवाडा पंस जगातील उमेदवार प्रा. विष्णू सोपानराव गोरे यांच्या प्रचार निमित्ताने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शुक्रवारी कोळगाव, निवाडा, सिंधगाव आणि सांगवी येथे प्रचार बैठका घेऊन मतदारांशी संवाद साधला त्याचबरोबर समसापूर येथे जिल्हा परिषद गटातील बूथ प्रमुख आणि प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन आढावा घेतला.





या प्रचार दौऱ्यात आ. कराड यांच्यासमवेत तिन्ही उमेदवारासह माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, कुलदीप सूर्यवंशी, ज्ञानोबा भिसे, सुनील चेवले, परमेश्वर जाधव, रमेश कटके, श्रीकृष्ण पवार, अनुसया फड, रामराव मोरे, महादेव जाधव, विठ्ठल कस्पटे, नानासाहेब कस्पटे, रानबा मुळे, शिवमूर्ती उरगुंडे यांच्यासह अनेकजण होते. प्रत्येक गावात वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत आ. कराड यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

ठिकठिकाणच्या प्रचार सभेतून बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रेणापूर तालुका मुंडे साहेबांचा म्हणून ओळखला जातो. मुंडे साहेबांनंतर सलग पंधरा वर्ष काँग्रेसचे आमदार असताना त्यांनी पंधरा वर्षात काय केले असा प्रश्न उपस्थित करून मी चार-पाच वर्षात कितीतरी पटीने कामे केली असल्याचे सांगून विकास खुंटला काँग्रेसच्या या आरोपाचा समाचार घेताना कोणाचा विकास खुंटला? सामान्यांची कामे होत आहेत. ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळत आहे. काँग्रेस पुढाऱ्यांचा आणि बगल बच्याचाच विकास खुंटला असल्याचे दुःख काँग्रेसवाल्यांना होत आहे. जनतेनी ठरवले तर भल्याभल्यांची वाट लागल्याशिवाय राहत नाही हे आपण बहाद्दर मतदारांनी विधानसभेत दाखवून दिले आहे. पोहरेगाव गटात झालेल्या विकास कामामुळे भाजपला सर्वत्र मोठे समर्थन मिळत असून पोहरेगाव जिल्हा परिषदेची जागा यावेळी तीन हजार मताधिक्याने विजयी होईल याची मला खात्री आहे असे बोलून दाखवले.

ग्रामीण भागाचा विकास काय असू शकतो नरेंद्रजी मोदी आणि देवेंद्रजी फडणवीस यांनी दाखवून दिले आहे. त्यांनी सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे काम केले. काँग्रेसवाल्यांनी आजपर्यंत आडवा आणि जिरवाचेच राजकारण केले कधीही विकासाचे राजकारण केले नाही असा आरोप करून आ. कराड म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून ऊसाच्या टिपऱ्याचे राजकारण केले जात आहे. ऊसाच्या प्रत्येक गाडीमागे तीन टन उसाचा काटा मारण्याचे पाप केले जात आहे. ३० - ४० वर्ष कारखान्याने विविध पारितोषिक मिळवली तरीही अडीचशे तीनशे कोटी रुपयाचे कारखान्यावर कर्ज कसे असा प्रश्न उपस्थित करून खरे सहकार महर्षी असतील तर त्यांनी बाहेरच्या काट्यावर वजन केलेली ऊसाची गाडी कारखान्यात घेण्याचा धाडशी निर्णय घ्यावा, असे बोलून दाखवले.

येत्या काळात सर्व शिवरस्ते, पांदणरस्ते मजबूत करण्यासाठी, शासनाच्या सर्व योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी भाजपाला साथ द्या, आम्ही विकासाला मत मागतोय कोणाच्या प्रतिष्ठेसाठी मागत नाही. पुढाऱ्यांची चाकरी करण्यासाठी नव्हे तर जनतेची सेवा करण्यासाठी भाजपाचे उच्च सुशिक्षित उमेदवार आहेत. यांच्या समोरील कमळ चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील ठीकठिकाणच्या प्रचार बैठकीस प्रकाश रेड्डी, उत्तम वांगे, ज्ञानोबा जानकर, सदाशिव राठोड, गंगाधर गोटके, भालचंद्र शिंदे, पंडितराव सावंत, कमलाकर जाधव, जयद्रत सावंत, मेघराज जाधव, प्रशांत जाधव, दगडू सावंत, गुणवंत जोगदंड, दत्ता चेवले, विलास चेवले, गोवर्धन चेवले, मिलिंद कुलकर्णी, अकबर शेख, पृथ्वीराज उरगुंडे, रसूल शेख, संगमेश्वर स्वामी, हरिभाऊ कस्पटे, राम गायकवाड, बाळू करपे, अमर उरगुंडे, गोविंद जाधव, राजाभाऊ सावंत, सोमनाथ जाधव, इंद्रजीत जाधव, कैलास सावंत, अमोल अडसूळ, गंगाधर पांचाळ, केरबा दुड्डे, भालचंद्र शिंदे, राम लकडे, प्रभाकर साळुंके यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्र उभारणीत पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार प्रेरणादायी - प्रा.डॉ.सुदाम पवार

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनसंघाचे नेते,एकात्म मानवतावादाचे जनक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी समर्पित केले.वैश्विक एकता,सृजनात्मकता आणि सहकार हाच मानवी उन्नतीचा खरा मार्ग आहे एकात्म मानवदर्शन हाच भारतीय संस्कृतीच्या शाश्वत मूल्यधारेचा झरा आहे.असे विचार मांडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार राष्ट्र उभारणीत प्रेरणादायी आहेत असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा.डॉ.सुदाम पवार यांनी केले. ते लातूर येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयाच्या वतीने मौजे सेलू ता. औसा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.



याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.तुकाराम येमले,श्री.ज्ञानेश्वर पोतदार,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना प्रा.तुकाराम येमले म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी वर्चस्ववाद,अनियंत्रित भांडवलशाहीची स्थिती असताना ची अंत्योदय ही संकल्पना मांडली.आजच्या जनधन,मुद्रा योजना,आवास ,आयुष्यमान भारत योजना हे अंत्योदय चे प्रकटीकरण आहे. असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.वसंत बंडे यांनी केले,सूत्रसंचालन प्रा.रवि चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्री.भास्कर कदम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी,महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# केशवराजमध्ये स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभाचे पहिले सत्र संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.३१ जानेवारी २०२६ वार शनिवार रोजी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभाचे पहिले सत्र संपन्न झाले. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केशवराज शैक्षणिक संकुलाच्या स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर,प्रमुख पाहुणे दयानंद कला महाविद्यालयाचे प्रा.संदीपान जगदाळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख, सहप्रमुख बालासाहेब करपुडे, विद्यार्थी प्रतिनिधी आदित्य गरड, विद्यार्थिनी प्रतिनिधी कौसंबी पाटील यांची मंचावर उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते हिंदू देव-देवतांच्या चित्र प्रदर्शनीच्या उद्घाटनाने तसेच सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.स्नेहसंमेलनानिमित्त संस्कारमंडळ, विज्ञानमंडळ, बलोपासक मंडळ, कलोपासक मंडळ, ज्ञानोपासक या सर्व मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या वैयक्तिक व सांघिक स्पर्धेतील पाचवी ते सातवी विभागातील एकूण ३५४ बक्षीसपात्र विजेत्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. संदिपान जगदाळे असे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन केले जाते. कला, क्रीडा,नाट्य, व्यायाम, खेळ यातूनच बलसंवर्धन, संघटन कौशल्य वाढीस लागते. स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समोर येतात. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच मैदानी खेळात सहभागी व्हावे व मोबाईल पासून दूर राहावे, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. याप्रसंगी त्यांनी शिवरायांचा पोवाडा सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

अध्यक्षीय समारोपात धनंजय तुंगीकर यांनी प्रथम बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुण विकसित करण्यासाठी विद्यालयात अनेक उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्यात संस्कार, सांघिक वृत्ती यांची जोपासना व्हावी, मैत्रीभाव वाढीस लागते. यासाठी या उपक्रमांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे याप्रसंगी त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी परिश्रम करून यश मिळवावे, अपयशाने खचून न जाता प्रयत्न करावेत असे आवाहन केले. याप्रसंगी शिक्षण विवेक अंकाच्या संकलित साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यासाठी कांचन तोडकर व स्मिता मेहकरकर यांनी परिश्रम घेतले. बक्षीसांचे वाचन शरद पांचाळ यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत स्नेहसंमेलन सहप्रमुख बालासाहेब करपुडे यांनी केले. आराध्या कदम या विद्यार्थिनीने वैयक्तिक गीत सादर केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अभ्यासपूरक मंडळ सहप्रमुख मीरा चामवाड यांनी केले तर कल्पना कडेपूरकर यांच्या कल्याणमंत्राने बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षा दुर्गा गोविंदपुरकर, माजी विद्यार्थी प्रदीप राऊत, सर्व शिक्षक व पाचवी ते सातवी विभागातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

या पारितोषिक वितरणाच्या पहिल्या सत्राच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, स्नेहसंमेलन प्रमुख शैलाजा देशमुख, सहप्रमुख बाळासाहेब करपुडे, सर्व मंडळप्रमुख, चित्र प्रदर्शनी प्रमुख व्यंकटेश माने तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# टक्केवारी आणि कमिशनखोरीचा धंदा आता बंद करा; मंजूर निधी कंत्राटदारांच्या नव्हे,तर जनतेच्या कामावर खर्च व्हावा! : आ. देशमुख

**उदगीर/प्रतिनिधी :** ''उदगीर आणि जळकोट परिसरात हजारो कोटी रुपयांचा निधी आणल्याच्या गप्पा मारल्या जातात, मात्र प्रत्यक्षात जमिनीवर कामे दिसत नाहीत. येथे केवळ टक्केवारी आणि कमिशनखोरीचा खेळ सुरू असून, सरकारी योजनांचा लाभ सामान्य जनतेऐवजी केवळ कंत्राटदार आणि लोकप्रतिनिधींच्या खिशात जात आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि जिल्हा परिषदेत पारदर्शक प्रशासन आणण्यासाठी काँग्रेस आघाडीला विजयी करा,'' असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

लातूर जिल्हा परिषद निवडणूक आणि उदगीर पंचायत समिती निवडणुकीच्या संदर्भाने सोमनाथपूर जिल्हा परिषद गटातील उमेदवार जयश्री मनोहर तोंडारे, गुडसूर पंचायत समिती गणातील उमेदवार सौ सुनीता राहुल घोणसे व सोमनाथपूर पंचायत समिती गणातील उमेदवार सौ छायाबाई बालाजी हैबतपुरे, तसेच लोहारा मतदारसंघातील उमेदवार यांच्या प्रचारार्थ शनिवार दि. ३१ जानेवारी रोजी दुपारी उदगीर तालुक्यातील लोणी येथील हनुमान मंदिर चौकात काँग्रेस आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न झाली, आयोजित प्रचार सभेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते बसवराज पाटील नागराळकर, शिवाजीराव हुडे, कल्याण पाटील व इतर मान्यवरांसह उपस्थित राहून त्यांनी संबोधित केले.

यावेळी, उदगीर काँग्रेस प्रभारी श्रावण रॅपनवाड, संतोष बिरादार, विनोबा पाटिल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर तालुकाध्यक्ष प्रशांत मोरे शिलाताई पाटिल, पद्माकर उगीले, चंदन पाटिल नागराळकर, मंजुरखा पठाण, रा.स.प. जिल्हाध्यक्ष नागनाथ बोडके, सोनू पिंपरे, राजेंद्र पाटिल, विवेक जाधव तोगरी जिल्हा परिषद गटाचे काँग्रेस आघाडीचे उमेदवार शिवाजीराव मुळे, मधुकरराव एकरगेकर, लोहारा जिल्हा परिषद गटाचे काँग्रेस आघाडीचे उमेदवार मुकेश भालेराव, संध्याताई पटवारी, आशिष पाटिल, उत्तम पाटिल, लक्ष्मण पटवारी, सुभाष कावर, बबन फड, नागनाथ सोलापूरे, नरसिंग कांबळे,




वैजनाथ बिराजदार, अजीज मोलाना, जिल्हा परिषद गट सोमनाथपूर काँग्रेस आघाडी उमेदवार जयश्री मनोहर तोंडारे, पंचायत समिती गण सोमनाथपुर काँग्रेस आघाडी उमेदवार छायाबाई बालाजी हैबतपुरे,गुडसूर काँग्रेस आघाडी उमेदवार सुनिता राहुल घोनसे आदिसह काँग्रेस आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रचार सभेचा शुभारंभ माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला यावेळी पूढे बोलतांना

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, उदगीर आणि जळकोट परिसरात हजरो कोटी रुपयांचा निधी आणल्याचे येथील लोकप्रतिनिधी सांगतात परंतु त्या योजना राबवल्याचे कुठेच दिसत नाही. इथे फक्त टक्केवारीचा खेळ चालतो असे लोकच सांगताहेत, त्यामुळे येथे येणाऱ्या योजना आणि निधी फक्त गुत्तेदार आणि पर्यायाने लोकप्रतिनिधीसाठीच राबवल्या जात आहेत. त्यामुळे आपणाला ही परिस्थिती बदलायची आहे, शासनाच्या योजना लोकांसाठी राबवायच्या असतील, दर्जे दार कामे करायची असतील तर, समाजाशी बांधिलकी असलेला काँग्रेस पक्ष आणि त्या पक्षाचे लोकाभिमुख उमेदवार निवडून येणे आवश्यक असल्याचे यावेळी बोलताना सांगितले.

लातूर जिल्हा परिषद आणि उदगीर पंचायत समितीमध्ये, भ्रष्टाचारमुक्त पारदर्शक गतिमान प्रशासन निर्माण करण्यासाठी या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहनही यावेळी बोलतांना आमदार देशमुख यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते बसवराज पाटिल नागराळकर म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने माणसात माणूस ठेवला नाही भारतीय संविधानाने देश चालला पाहिजे सध्या महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे आपल्या देशातील लोकशाही टिकली पाहिजे केंद्रातील सत्ताधारी भाजप सरकार भारतीय न्यायव्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करत आहेत लातूर शहर महानगरपालिकेत काँग्रेसची सत्ता आली त्यामुळे आता लातूर जिल्हा परिषद व जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीमध्ये काँग्रेस आघाडीची सत्ता येणार आहे त्यामुळे सर्वांनी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या पाठीमागे उभे राहावे असे सांगून येत्या सात तारखेला काँग्रेस आघाडीच्या सर्व जिल्हा परिषद गट व सर्व पंचायत समिती गणातील उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात कल्याण पाटील, शिवाजीराव हुडे, पद्माकर उगीले यांनी मनोगत व्यक्त करून काँग्रेस आघाडीच्या सर्व जिल्हा परिषद गट व सर्व पंचायत समिती गणातील उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले. सूत्रसंचालन अमजद पठाण यांनी केले तर शेवटी आभार विवेक जाधव यांनी मानले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# गंधोरा येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व काँग्रेस महाविकास आघाडीचा निर्धार मेळावा संपन्न



तुळजापूर (प्रतिनिधी): आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर तुळजापूर तालुक्यातील गंधोरा येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व काँग्रेस आय महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या माध्यमातून खासदार ओमराजे निंबाळकर यांनी मतदारांशी थेट संवाद साधत महाविकास आघाडीची विकासाची वज्रमूठ अधिक घट्ट केली. या सभेला शिवसैनिकांसह काँग्रेसचे पदाधिकारी आणि गंधोरा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या आक्रमक शैलीत मार्गदर्शन करत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली आणि स्थानिक विकासाचा आराखडा मांडला. मूलभूत प्रश्नांवर भर: सभेमध्ये शेतकरी, महिला आणि युवकांच्या ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शेतीसाठीची वीज आणि पाणी या विषयांवर खासदार निंबाळकर यांनी पक्षाची ठाम भूमिका स्पष्ट केली. विकासाची दिशा: शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष हा सर्वसामान्यांच्या विश्वासावर आधारलेला पक्ष आहे. विकास, न्याय आणि लोकहितासाठी आमचा लढा कायम राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

उमेदवारांची ग्वाही: महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनीही मतदारांशी संवाद साधला. निवडून आल्यानंतर प्रामाणिक सेवा, पारदर्शक कारभार आणि गांवाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू, अशी ग्वाही उमेदवारांनी दिली. या सभेमुळे गंधोरा गटातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, महाविकास आघाडीच्या बाजूने मतदारांचा मोठा कौल दिसून येत आहे. सभेच्या यशस्वीतेसाठी महाविकास आघाडीचे स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी मोठे परिश्रम घेतले.यावेळी जितेंद्र कानडे संजय भोसले व आदीसह उमेदवार इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थीत होते.

# तेर गटात 'दादांची ताकद - ताईंचा करिष्मा!'

## अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारामुळे विरोधक हादरले; बहुमताचा बिगुल वाजलाच!

**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)**– जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणसंग्रामात तेर गट सध्या राज्याच्या लक्षाचा केंद्रबिंदू ठरला असून, येथे सुरू असलेली राजकीय घुसळण आता थेट सत्तासमीकरण बदलणारी ठरत असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. माननीय आमदार राणा दादा पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांनी तेर गटातून प्रचार यंत्रणा सुरू करताच संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

अर्चनाताई पाटील यांचा प्रचार म्हणजे केवळ भाषणांचा गाजावाजा नसून, तो कर्तृत्वाचा, कामाचा आणि विश्वासाचा प्रचार आहे. विकासकामे, लोकांशी थेट संवाद, प्रशासनाचा अनुभव आणि सामाजिक बांधिलकी यामुळे त्यांना स्वतःचे कर्तृत्व सांगण्याची गरजच उरलेली नाही. लोकांना माहीत आहे – त्यांनी काय केले आहे आणि काय करू शकतात!

दुसरीकडे, तेर गटातील ' तिरंगी

लढत' आता अधिक तीव्र झाली असली तरी राजकीय जाणकारांच्या मते खरी लढत ही भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील गट विरुद्ध उद्धव ठाकरे गट व ओमरजे निंबाळकर गट यांच्यात आहे. या थेट टक्करमध्ये अर्चनाताई पाटील यांची उमेदवारी म्हणजे राणा दादा पाटील गटाची राजकीय ताकद आणि रणनीतीचा अचूक डाव मानला जात आहे.

अर्चनाताई पाटील यांना जिल्हा परिषद व प्रशासनाचा अनुभव, मजबूत राजकीय पार्श्वभूमी आणि कार्यकर्त्यांचे जाळे लाभलेले असल्याने तेर गटात त्यांचे वर्चस्व दिवसेंदिवस अधिक ठळक होत आहे. प्रचार सुरू होताच विरोधकांची धावपळ, हालचाली आणि अस्वस्थता स्पष्टपणे दिसून येत आहे.

आज तेर गटात परिस्थिती अशी आहे की, निवडणूक जिंकणार कोण? हा प्रश्न उरलेला नसून, बहुमत किती? याचीच चर्चा सुरू आहे. अर्चनाताई पाटील या तेर गटातून बहुमताने निवडून येणार, याबाबत राजकीय वर्तुळात कुठलीही शंका उरलेली नाही.

आता या राजकीय रणांगणात दादांची ताकद आणि ताईंचा करिष्मा यांचा मिलाफ विरोधकांसाठी मोठे आव्हान ठरत असून, तेर गटातील सत्ता कुणाच्या हाती जाणार याचे संकेत स्पष्टपणे राणा दादा पाटील गटाच्या बाजूने झुकलेले दिसत आहेत.




# पळसप गटात 'शिंदे गटाचा धडाका'!

## जनतेचा खरा सेनापती - अजित लाकाळ, विजय अटळ!



**धाराशिव (रामेश्वर डोंगरे )**–पळसप गटाच्या राजकारणात आज शिवसेना (एकनाथ शिंदे गट) अधिकृत उमेदवार अजित लाकाळ यांचे नाव म्हणजे विश्वास, काम आणि संघर्षाचे प्रतीक ठरत आहे. पळसप गटातून उमेदवारी मिळाल्यानंतर संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, हा आपलाच उमेदवार असा एकमुखी सूर नागरिकांतून उमटत आहे.

अजित लाकाळ हे असे उमेदवार आहेत की, सत्तेत असो वा नसो – त्यांचे काम कधीही थांबले नाही. समाजकारण आणि समाजसेवा हा त्यांचा स्वभावच बनला आहे. रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, गरिबांचे प्रश्न असोत वा युवक-महिलांचे प्रश्न – प्रत्येक विषयात अजित लाकाळ कायम रस्त्यावर उतरलेले दिसतात.

पळसप गटातील नागरिकांना नेमके काय हवे आहे, हे अजित लाकाळ यांना वेगळे सांगावे लागत नाही.

कारण ते जनतेतून आलेले, जनतेत राहिलेले आणि जनतेसाठीच झटलेले नेतृत्व आहे. अनेक वेळा कोणतीही सत्ता हातात नसतानाही त्यांनी प्रशासनाच्या दारात ठिय्या मांडून प्रश्न सोडवले. हीच त्यांची खरी ओळख आहे.

आज पळसप गटात अशी चर्चा आहे की,

अजित लाकाळ हा उमेदवार समाजसेवेच्या जोरावर उभा राहिलेला एकमेव उमेदवार आहे.

त्यांनी कधीही केवळ राजकारणासाठी राजकारण केले नाही; तर लोकांच्या दुःखाशी स्वतःला जोडून घेतले.

पुढील काळात पळसप गटाच्या सर्वांगीण विकासासाठी –

*पायाभूत सुविधा
*युवकांना रोजगार
*महिलांना सक्षम करणाऱ्या योजना
शेतकरी व गरिबांसाठी ठोस निर्णय

हे सर्व अजित लाकाळ यांच्या अजेंड्यावर ठामपणे आहे.

२४ तास जनतेसाठी उभा असलेला उमेदवार ही ओळख त्यांनी कृतीतून निर्माण केली आहे.

म्हणूनच आज पळसप गटात एकच चर्चा आहे –

अजित लाकाळ यांचा विजय म्हणजे काळ्या दगडावरची रेघ!

यात कसलेही दुमत नाही.

हा उमेदवार आपलाच आहे,

हा लढा आपलाच आहे,

आणि पळसप गटाचा विजय म्हणजे अजित लाकाळ यांचा विजय!

# डॉल्बी चालकांना धाराशिव पोलिसांनी दिला जबर दणका

## चार डॉल्बी वाहनांना ४० लाख ७४ हजार रुपयांचा दंड

धाराशिव (प्रतिनिधी); – या घटनेची पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, कुठल्याही प्रकारच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक कार्यक्रमाला डॉल्बी, डीजे वाद्यांचा कर्णकर्कश व गगणभेदी दणदणाट करण्याची परंपरा सर्रास फोफावत चाललेली आहे. त्यामुळे ध्वनी प्रदूषण व पर्यावरण प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढून त्याचा मानवी जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. असाच प्रकार धाराशिव शहरात देखील सुरू होता. त्यामुळे संबंधित सहा डॉल्बी, डीजे वाद्य चालकांसह वाहनांवर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यापैकी चार डॉल्बी, डीजे वाद्य वाहनांवर प्रत्येकी १० लाख असा ४० लाख रुपयांच्या हमी रक्षण बंद पत्रावर व अटी शर्तीवर तात्पुरते ताब्यात देण्याचा आदेश प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयाचे न्यायाधीश आर डी गायकवाड यांनी दि.३० जानेवारी रोजी दिले आहेत. तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्थात आरटीओ अधिकाऱ्यांनी संबंधित डॉल्बी डीजे, साऊंड सिस्टम व वाहनांवर ७४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

त्यामुळे डॉल्बी डीजे चालक व मालक यांचे धाबे दणाणले आहेत. ही कारवाई धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांनी केली आहे.याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.६ जानेवारी २०२६ रोजी धाराशिव शहरातील हजरत खॉजा शमशोद्दीन गाजी (रहे) यांच्या उरसानिमित्त धाराशिव शहरात डॉल्बी डीजे लावण्यात आले होते. मात्र या डॉल्बी चालकांनी डॉल्बींना ठरवून दिलेल्या आवाजाच्या मर्यादेपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणात आवाज सोडल्याने संपूर्ण शहरात दणदणाट घुमत होता. त्यामुळे ध्वनी प्रदूषण व पर्यावरण प्रदूषण झाल्यामुळे संबंधित डॉल्बी, साऊंड सिस्टिम व वाहनावर धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी गुन्हा दाखल करून प्रणव राजेंद्र तांबे रा. सातारा यांचे ४०७ टाटा टेम्पो क्रमांक एम.एच.११ टी – ५५२५, सौरभ सुरेश खामकर रा. शिरुर – पुणे यांचे टाटा ट्रक क्रमांक एम.एच. ११ ए.एल. – ०७१९, गणेश रामदास मिरगी रा. सातारा यांचे टाटा ट्रक क्रमांक एम.एच. ११ बी.एल. – ७४७५ व संतोष किसन मेघावत रा. पुणे यांचे टाटा ट्रक वाहन क्रमांक एम.एच. ४६ ई – १४८४ तसेच साऊंड सिस्टम चालक सागर संभाजी शिंदे रा. कोल्हापूर यांच्यासह संबंधित वरील चार वाहने दि.६, ७ व ८ जानेवारी रोजी ताब्यात घेतली. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात ध्वनी प्रदूषण कलम ३, ४, ५ व ६ तर पर्यावरण संरक्षण कलम ३ व ४ तसेच भारतीय न्याय संहिता कलम २९३, २८९, २९२ व २२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित वाहन मालक व चालक यांच्या विरोधात धाराशिव येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयामध्ये तपास अहवाल (चार्जशीट) दाखल करण्यात आले.

जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर टी गायकवाड यांनी वरील सर्व डॉल्बी व साऊंड सिस्टम आणि वाहनांवर कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर वाहतूक करण्यावर कायमची बंदी घातली आहे. तसेच प्रत्येकी १० लाख रुपये अशी एकूण ४० लाख रुपयांच्या हमी रक्षण बंद पत्रावर व अटी शर्यतीवर तात्पुरती ताब्यात दिले आहेत. विशेष म्हणजे दिलेल्या अटींमध्ये यापुढे ती डॉल्बी, डीजे व साऊंड सिस्टम आणि वाहन कोणालाही विकता येणार नाही. त्यामध्ये कोणत्याही स्वरूपाचा बदल करता येणार नाही. तसेच न्यायालय जेव्हा आदेश देईल तेव्हा त्यासंबंधी डीजे डॉल्बी चालक मालकांनी व वाहनधारकांनी हजर करावी लागणार आहेत. ते वाहन कोणत्याही बेकायदेशीर कृत्यासाठी वापरता येणार नाही. याबरोबरच त्या मालमत्तेची अर्जदारांनाच सर्व दृष्टिकोनातून देखरेख व संभाळ करावा लागणार आहे.तर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने अनुक्रमे १४५००, १९५००, १७५०० व २२५०० असा एकूण ७४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली व धाराशिव उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांच्या पथकाने केली. या पथकामध्ये धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संदीप ओहाळ, अक्षय दिघोळे, पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर माळी आणि राम कनामे यांचा समावेश होता. न्यायालयाच्या आदेशामुळे यापुढे धाराशिव शहरात कोणत्याही कार्यक्रमात डॉल्बी वाजणारच नाही असा संदेश या माध्यमातून दिला आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना डॉल्बीपासून होणाऱ्या त्रासातून कायमस्वरूपी मुक्तता मिळणार असून डॉल्बीमुक्त शहर होईल असा अंदाज जाणकारातून वर्तविण्यात येत आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक – २०२६

## जाहीर प्रचार संपल्यानंतर जनमत व मतदानोत्तर चाचण्यांवर निर्बंध :राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश

धाराशिव, (जिमाका)– जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक–२०२५ च्या अनुषंगाने सचिव, राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांच्या संदर्भीय पत्रानुसार संबंधित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याच्या तारखेपासून संपूर्ण निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहिता प्रभावीपणे अंमलात आणणे बंधनकारक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार,जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर आणि मतदान समाप्त होईपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही स्वरूपाची जनमत चाचणी (Opinion Poll) तसेच मतदानोत्तर चाचणी (Exit Poll) घेण्यास व त्यांचे निष्कर्ष प्रसिद्ध करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

या कालावधीत वर्तमानपत्रे, नियतकालिके, माहितीपत्रके,फलक किंवा तत्सम कोणत्याही प्रकारच्या प्रसिद्धी माध्यमांतून तसेच खाजगी किंवा सरकारी रेडिओ, दूरदर्शन,केबल टी.व्ही.,डीटीएच, प्रादेशिक किंवा स्थानिक केबल टी. व्ही.,सॅटेलाइट चॅनेल्स,एसएमएस सेवा,इंटरनेट,फेसबुक तसेच तत्सम उपलब्ध असलेल्या सर्व सोशल मिडिया माध्यमांद्वारे जनमत चाचणी व मतदानोत्तर चाचणीचे कोणतेही निष्कर्ष प्रसारित करता येणार नाहीत.

निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता, निष्पक्षता व लोकशाही मूल्ये अबाधित राखण्यासाठी हे निर्बंध अत्यंत महत्त्वाचे असून,संबंधित सर्व विभाग,माध्यमे व व्यक्तींनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे,असे निर्देश देण्यात आले आहेत.आयोगाच्या आदेशानुसार या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही तत्काळ अनुसरण्यात यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# मोटरसायकलवरुन पडून गंभीर जखमी होवून मयत

धाराशिव (प्रतिनिधी)– आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, याकुब चाँद शेख, रा. नान्नज ता. जि. सोलापूर व सोबत मयत नामे–सादिक चाँदपाशा मुजावर, वय २७ वर्षे रा. गड देवधरी ता. जि. धाराशिव हे दि.०५.०१.२०२६ रोजी . मोटरसायकल क्र एमएच २५ बीबी १२६७ वरुन जात होते. दरम्यान वरुडा ब्रिज जवळ धाराशिव येथे याकुब शेख यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकल स्लीप होवून मोटरसायकलवर पाठीमागे बसलेला सादिक मुजावर हे मोटरसायकलवरुन पडून गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–रुकसाना चाँदपाशा मुजावर, वय ४८ वर्षे, रा. गड देवधरी ता. ता. जि. धाराशिव यांनी दि.३०.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५ (ब) मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649